cmyk

## संपादकीय

### गर्जा महाराष्ट्र माझा...!

महाराष्ट्र दिन दरवर्षी १ मे रोजी साजरा केला जातो. यासोबतच १ मे रोजी आंतरराष्ट्रीय कामगार दिनही साजरा केला जातो. हा दिवस १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेची आठवण करून देतो, ज्या दिवशी मराठी भाषिक लोकांना स्वतःचे राज्य मिळाले. या दिवशी शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांमध्ये भाषण आणि निबंध स्पर्धा आयोजित केल्या जातात, ज्यामुळे विद्यार्थ्यांना मराठी संस्कृती आणि इतिहासाबद्दल जाणून घेण्याची संधी मिळते.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com





बीड – महाराष्ट्र | वर्ष –५ | अंक–१२ | गुरूवार, दि.१ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# उसाच्या एफआरपीत १५ रुपयांची वाढ

## आता क्विंटलला मिळणार ३५५ रुपये दर, केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

दिल्ली । वृतसंस्था

**केंद्र सरकारने उसाच्या एफआरपीत क्विंटलमागे १५ रुपयांची वाढ केली आहे. आता गाळप हंगाम २०२५–२६ साठी १०.२५ टक्के साखर उताऱ्यासाठी क्विंटलला ३५५ रुपये एफआरपी मिळणार आहे. तसेच ९.५ टक्क्यापेक्षा कमी उतारा असला तरी जास्त कपात न करता ३२९ रुपये एफआरपी देण्यात येईल, असा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत**



**घेण्यात आला.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली

◀◀ पान २ वर

### किमान ३२९ रुपये मिळणार

ऊस उत्पादकांना केंद्राने पुन्हा एक दिलासा दिला आहे. साखर उतारा १०.२५ टक्क्यांपेक्षा कमी असेल तर ०.१ टक्क्यामागे ३.४६ रुपये कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला. पण कारखान्याचा साखर उतारा ९.५ टक्क्यांपेक्षा कमी असेल तर त्यापुढे कपात करता येणार नाही. शेतकऱ्यांना ९.५ टक्के उताऱ्याप्रमाणे म्हणजेच ३२९ रुपये एफआरपी द्यावी, असाही निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.

### एफआरपी थकबाकी

चालू गाळप हंगामात गाळप केलेल्या उसाच्या बिलापोटी देशातील शेतकऱ्यांना ९७ हजार २७० कोटी रुपयांची एफआरपी देणी होती. त्यापैकी २८ एप्रिलपर्यंत ८५ हजार ९४ कोटी रुपये शेतकऱ्यांना अदा करण्यात आले. एकूण एफआरपीच्या ८७ टक्के रक्कम शेतकऱ्यांना अदा करण्यात आली. तसेच गाळप हंगाम २०२३–२४ मधील एकूण १ लाख ११ हजार ७८२ कोटी रुपये एफआरपी देणी होती. त्यापैकी २८ एप्रिलपर्यंत शेतकऱ्यांना १ लाख ११ हजार ७०३ कोटी रुपये देण्यात आले. म्हणजेच गेल्या हंगामातील ९९.९२ टक्के एफआरपी शेतकऱ्यांना मिळाली आहे, असेही केंद्राने स्पष्ट केले.

# मोठा निर्णय ; जातनिहाय जनगणनेचे मुंडे साहेबांचे स्वप्न पुर्ण होणार!

## मोदी सरकारकडून घोषणा; वंचितांचा विकास करण्यासाठी मदत होणार







नवी दिल्ली । वृतसंस्था

**लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांनी २००९ ते २०१४ या दरम्यान लोकसभेत ओबीसींच्या विकासाचा मुद्दा मांडत देशात जातनिहाय जनगणना करण्याची मागणी करीत सभागृह दणाणून सोडले होते. मुंडे साहेबांचे जातनिहाय जनगणेचे स्वप्न अखेर मोदी सरकारकडून पुर्ण होणार असल्याचे आता सिध्द दिसत आहे. देशात स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा आणि ८४ वर्षानंतर जातनिहाय जनगणना होत आहे. मोदी सरकारच्या या निर्णयाचे विरोधकांनी सुध्दा स्वागत केले आहे.**

स्व. गोपीनाथ मुंडे यांनी खासदार असताना लोकसभा सभागृहात जातनिहाय जनगणना करण्याची मागणी करीत आपली आक्रमक भुमिका मांडली होती. त्यांच्या या भुमिकेचे देशभरात स्वागत करण्यात आले होते. मात्र तत्कालीन केंद्र सरकारने मुंडे साहेबांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. आता मोदी सरकारने याबाबत महत्वाचा निर्णय घेत मुंडे साहेबांचे जातनिहाय जनगणनेचे स्वप्न पुर्णत्वास येणार असल्याचे दिसते. गेल्या अनेक दिवसांपासून विरोधकांकडून देशभरात जातीनिहाय

◀◀ पान २ वर

### “ विरोधकांची काय मागणी होती?

गेल्या अनेक दिवसापासून विरोधकांकडून देशात जातनिहाय जनगणना व्हावी, अशी मागणी केली जात आहे. विशेष म्हणजे काँग्रेसारख्या देशातील महत्त्वाच्या विरोधी पक्षाने हा मुद्दा चांगलाच लावून धरला होता. लोकसभा निवडणुकीत महाआघाडीने याला प्रचाराचा मुद्दा बनवला होता. आम्ही सत्तेत आलो तर देशभारत जातनिहाय जनगणना केली जाईल, असे आश्वासन विरोधकांनी दिले होते.

### “ राहुल गांधींचा जातनिहाय जनगणनेला पाठिंबा

काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेत केंद्र सरकारच्या जातनिहाय जनगणनेच्या निर्णयाचे समर्थन केले आहे. यादरम्यान त्यांनी काही मागण्याही केल्या आहेत. तसेच पहलगाम हल्ल्यातील मृतांना शहिदांचा दर्जा देण्याची मागणी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहलगाम हल्ल्याचे उत्तर द्यावे आमचा पाठिंबा आहे असेही ते म्हणाले आहेत.

## पहलगामधील हल्ला हा देशावरील हल्ला-शरद पवार



ठाणे । प्रतिनिधी

**पहलगामध्ये झालेला हल्ला हा या देशावरील हल्ला आहे. ज्या व्यक्तींच्या कुटुंबामध्ये शहीद झाले त्यांनी ही देशासाठी दिलेली किंमत आहे. त्यामुळे या ठिकाणी धर्म, जात, पात भाषा या गोष्टी आणायच्या नाहीत.**

भारतीयांवर हल्ला कोणत्याही शक्ती करत असतील, तर देशवासियांना देखील कशाचीही अपेक्षा न करता एकत्र राहावे लागेल, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी धर्म विचारुन हल्ला झाला नसल्याच्या त्या वक्तव्यावर होणाऱ्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर शरद पवार यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ठाणे येथे तुळजाभवानी मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा शरद पवार यांच्या उपस्थितीत पार पडला. मात्र, आपण आता पवित्र स्थानी आहोत, त्यामुळे राजकारणावर भाष्य करायला नको, असे देखील शरद पवार यांनी म्हटले आहे. देशाचे प्रधानमंत्री आणि अन्य सहकारी यासंबंधीची उपाययोजना करत आहेत. त्याला पूर्ण सहकार्य आम्हा सर्वांचे आहे. त्या संबंधीचेच वक्तव्य आम्ही सर्वपक्षीय नेत्यांनी केलेले आहे. सर्व पक्ष बैठकीमध्ये आमच्या प्रतिनिधींनी देखील

◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### पंतप्रधान मोदींचा रशिया दौरा रद्द

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदींचा रशिया दौरा रद्द झाला आहे. भारतातील सध्याच्या परिस्थितीनुसार दौरा रद्द करण्यात आला आहे. ९ मे रोजी होणाऱ्या मॉक्सोतील विजय दिवस परेडला मोदी हजर राहणार होते. मात्र दौरा रद्द झाल्याने भारताकडून विजय दिवस परेडसाठी राजनाथ सिंह यांना पाठवण्यात येणार आहे.

### मरियम शरीफने आळवला अणुबॉम्ब राग

लाहौर : पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांची मुलगी मरियम शरीफने पोकळ धमकी दिली आहे. पाकिस्तानी नागरिकांना संबोधित करताना मरीयमने ही धमकी दिली आहे. घाबरु नका, पाकिस्तानकडे अणुबॉम्ब आहेत. त्यामुळे पाकिस्तानवर कुणीही हल्ला करु शकत नाही असे मरियमने म्हटले आहे.

### पोलिसांची रिक्त पदं कधी भरणार–हायकोर्ट

मुंबई–पोलिसांची रिक्त पदं किती दिवसांत भरणार असा सवाल हायकोर्टाने राज्य सरकारला विचारला आहे. यावर येत्या २३ जूनपर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचा आदेश दिला आहे. प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी दिलेली ही अंतिम संधी असून यानंतर वेळ वाढवून मिळणार नाही, अशी तंबीही दिली आहे.

### भारत–पाकिस्तान तणावावर अमेरिकेची दुटप्पी भूमिका

नवी दिल्ली : भारत–पाकिस्तान तणावावर अमेरिकेची दुटप्पी भूमिका समोर आली आहे. अमेरिकेने दोन्ही देशांना शांततेचे आवाहन केले आहे. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी भारत आणि पाकिस्तानला परिस्थिती वाढवू नका, असे आवाहन केले आहे. यातून अमेरिकेची दुटप्पी भुमिका दिसून येत आहे.

### मदर डेअरीचे दूध २ रुपयांनी महागलं

मुंबई : मदर डेअरीने देशभरात दुधाच्या किमतीत प्रतिलिटर २ रुपयांची वाढ केली आहे. नवीन किमती आजपासून लागू झाल्या आहेत. मदर डेअरीचे फुल क्रीम दूध ६९ रुपयांना आणि टोन्ड दूध ५६ रुपयांना मिळेल. उन्हाळी हंगामात वाढत्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचे कंपनीने सांगितले आहे.

### एलएलबीची सीईटी आता २ मे रोजी होणार

मुंबई : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने ३ व ४ मे रोजी एलएलबीची सीईटी परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला होता. मात्र आता परीक्षेच्या तारखेत बदल करण्यात आला आहे. या परीक्षेसाठी आरक्षित सरकारी महाविद्यालयांमधील परीक्षा केंद्र ४ मे रोजी होणाऱ्या नीट परीक्षेसाठी आरक्षित केली आहेत. त्यामुळे एलएलबीची सीईटी २ मे रोजी घेण्याचा निर्णय प्रवेश परीक्षा कक्षाने घेतला आहे. तसेच विद्यार्थ्यांना २ मे रोजीच्या परीक्षेबाबत प्रवेश पत्र पाठवले आहे.

### पाकला बिश्नोई गँग धडा शिकवणार

नवी दिल्ली–लॉरेन्स बिश्नोई ग्रुपने पाकिस्तानात घुसून पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्याची धमकी दिली आहे, हाफिज सईदचा फोटो पोस्ट करत त्याला ठार मारण्याचा इशारा दिला असून सोशल मीडियावर यासंदर्भातील पोस्ट व्हायरल झाली आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वर्षावर शिफ्ट

मुंबई–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अखेर वर्षा बंगल्यावर राहण्यासाठी गेले आहेत. अनेक महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पत्नी अमृता फडणवीस आणि मुलीसह वर्षावर वास्तव्याला गेले आहेत.

### सुट्टीची सूचना

जागतीक कामगार दिनानिमित्त आज दि.१ मे रोजी दै. राज्य लोकतंत्र कार्यालयास सुट्टी असल्याने, उद्या दि.२ मे रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, वार्ताहर, वितरक, यांनी नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक

# प्रधानमंत्री आवास योजनेच्या सेल्फ सर्व्हेसाठी मुदतवाढ

## १५ मे पर्यंत सर्व्हे करून घेण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

बीड । प्रतिनिधी

पात्र असलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून. त्याकरिताऑनलाईन सेल्फ सर्व्हे करण्याचा अंतिम दिनांक ३० एप्रिल २०२५ होता. त्याला आता १५ दिवसांची मुदतवाढ मिळाली असून १५ मे २०२५ पर्यंत नागरिकांना मोबाईल ॲपद्वारे सेल्फ सर्व्हे करता येणार आहे. त्यामुळे बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यातील ज्या नागरिकांचे सेल्फ सर्व्हे करणे बाकी आहे अशा निकषपात्र नागरिकांनी



आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत १५ मे पर्यंत सेल्फ सर्व्हे करून घ्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सध्या सद्या सेल्फ सर्व्हे करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी/ ग्रामसेवक यांचे मार्फत किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकता. निकषांचे पालन करून कच्चे घर

◀◀ पान २ वर

## अखेर समता परिषदेच्या ३२ वर्षांच्या लढ्याला यश

# देशात जातीनिहाय जनगणना होणार-ॲड.सुभाष राऊत

### बीडमध्ये समता परिषदेच्या वतीने फटाके फोडून आणि पेढे वाटून मोदी सरकारच्या निर्णयाचे स्वागत!



बीड । प्रतिनिधी

मोदी सरकारने देशात जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल देशातील समस्त ओबीसी समाजाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह संपूर्ण मंत्रिमंडळाचे आभार मानले जात आहेत. हा अतिशय क्रांतिकारी निर्णय असून स्वातंत्र्योत्तर भारतात प्रथमच जातनिहाय जनगणना होणार असल्याने बीड जिल्हा समता परिषदेने येथील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९०.५० क्विंटल | २,४४० | २,७०१ | २,५५५ |
| ज्वारी/हायब्रिड : ६५.०० क्विंटल | १,६५० | २,६११ | २,२५४ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१२५ | २,१२५ | २,१२५ |
| तूर : १.०० क्विंटल | ६,४०१ | ६,६०० | ६,५०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ९२.०० क्विंटल | २,३४४ | २,७२४ | २,५२४ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: १०२.५० क्विंटल | ४,४०१ | ४,४४१ | ४,४२२ |
| हरभरा: ४९.०० क्विंटल | ५,३०१ | ६,००० | ५,४९९ |

# पुढचे आमरण उपोषण मुंबईत; जरांगेंची मोठी घोषणा

## २९ ऑगस्टचा ठरला मुहुर्त, पत्रकार परिषदेत दिली माहिती

बीड । प्रतिनिधी

**आतापर्यंत संयमाने घेतले, पण सरकारने १०० टक्के आपली फसवणूक केली., असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी पुढच्या आंदोलनाबाबत मोठी घोषणा केली. आता मुंबईत २९ ऑगस्ट २०२५ ला आमरण उपोषण होणार असे म्हणत मनोज जरांगेंनी उपोषणाची तारीख देखील सांगितली. मनोज जरांगे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी मराठा आरक्षणाबाबत सरकारने फसवणूक**



**केल्याचे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ यांच्यावर जोरदार टीका केली.**

मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले की, ‘प्रथम सरकारचे कौतुक आहे. दोन वर्षे झाले तरीही आम्ही संयमाने घेत आहोत. मागील उपोषण सोडताना चार मागण्यांची तात्काळ अंमलबजावणी केली जाईल असे सांगितले होते. आज तीन महिने पूर्ण झाले कुठल्याही मागण्यांची अंमलबजावणी झाली नाही. जरांगेंनी यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर देखील टीका केली. ते म्हणाले की, मराठा आणि कुणबी एकच आहे याचा अध्यादेश काढा.

### १ ऑगस्ट रोजी ठरणार आंदोलनाची दिशा

सगे सोयऱ्याच्या अधिसूचनेला दीड वर्ष पूर्ण झाले आहे. पुढील आंदोलनाची दिशा १ ऑगस्ट रोजी सांगणार आहे. सरकारने आपली शंभर टक्के फसवणूक केली आहे. आमच्या ज्या मागण्या आहेत त्या तुमच्या पाठ झाल्या आहेत. यावर सरकारची पीएच.डी झाली आहे. शिंदे समितीने काम केले. आमच्या नोंदी नाहीत म्हणले होते. तुम्ही त्या नोंदी शोधल्या त्यामुळे सरकारचे कौतुक केले. आमच्या कुणबी नोंदी सापडल्या. जो अधिकारी कुणबी प्रमाणपत्र देत नसेल त्याला तात्काळ निलंबित करून टाका, अशी मागणी जरांगेंनी यावेळी केली आहे.

विद्यार्थ्यांनी नेत्यांचे ऐकून शिक्षणात जातिवाद आणू नका. आम्ही जातिवाद करत नाही. सरकारकडे मागणी

◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# गर्जा महाराष्ट्र माझा...!

महाराष्ट्र दिन दरवर्षी १ मे रोजी साजरा केला जातो. यासोबतच १ मे रोजी आंतरराष्ट्रीय कामगार दिनही साजरा केला जातो. हा दिवस १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेची आठवण करून देतो, ज्या दिवशी मराठी भाषिक लोकांना स्वतःचे राज्य मिळाले. या दिवशी शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांमध्ये भाषण आणि निबंध स्पर्धा आयोजित केल्या जातात, ज्यामुळे विद्यार्थ्यांना मराठी संस्कृती आणि इतिहासाबद्दल जाणून घेण्याची संधी मिळते.

महाराष्ट्र दिन हा केवळ एक सुट्टीचा दिवस नाही तर मराठी माणसाच्या अस्मितेचा आणि अभिमानाचा उत्सव आहे. हा दिवस मराठी भाषा, संस्कृती, आणि परंपरांचा गौरव करतो. महाराष्ट्र दिन हा १ मे १९६० रोजी साजरा होण्यामागे एक मोठा इतिहास आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात भाषिक आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला. मराठी भाषिक लोकांनी स्वतःच्या स्वतंत्र राज्यासाठी जोरदार चळवळ उभी केली, ज्याला संयुक्त महाराष्ट्र चळवळ असे नाव देण्यात आले. या चळवळीत अनेकांनी बलिदान दिले. २१ नोव्हेंबर १९५६ रोजी मुंबईच्या फ्लोरा फाउंटन परिसरात हजारो आंदोलकांनी एकत्र येत सरकारच्या निर्णयाविरोधात जोरदार निदर्शने केली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यावर पोलिसांनी लाठीचार्ज आणि नंतर गोळीबार केला. या घटनेत १०६ आंदोलकांना आपले प्राण गमवावे लागले. हे हुतात्मे आजही महाराष्ट्राच्या मनामनात जिवंत आहेत. त्यांच्या बलिदानामुळेच शेवटी केंद्र सरकारने नमते घेतले आणि १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. या नव्या राज्याची राजधानी मुंबई ठरली आणि यशवंतराव चव्हाण यांनी पहिले मुख्यमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. या चळवळीत आचार्य प्रल्हाद केशव अत्रे, सेनापती बापट, आणि एस. एम. जोशी यांसारख्या नेत्यांनी मोलाची भूमिका बजावली. हा दिवस मराठी भाषा आणि संस्कृतीच्या एकतेचा प्रतीक बनला आणि आजही तो अभिमानाने साजरा केला जातो. महाराष्ट्राने छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, ते सावित्रीबाई फुले, शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांपर्यंत अनेक महान व्यक्ती दिल्या आहेत. या सर्वांनी महाराष्ट्राला जागतिक पातळीवर ओळख दिली आहे. महाराष्ट्र दिन हा तरुण पिढीला या वारशाची आठवण करून देतो आणि त्यांना आपल्या मुळांशी जोडतो. हा दिवस मराठी माणसाच्या एकतेचा आणि स्वाभिमानाचा संदेश देतो आणि पुढील पिढ्यांना प्रेरणा देणारा आहे. संत तुकाराम, ज्ञानेश्वर, आणि एकनाथ यांच्या सारख्या कित्येक महान संतांचे चरण आपल्या महाराष्ट्राला लाभले आहेत आणि या महाराष्ट्राच्या मातीतून कित्येक थोर महात्मे जन्माला आलेले आहेत. महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी झालेला संघर्ष मराठी माणसाच्या जिद्दीचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. मुंबईसह संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणण्यासाठी अनेकांनी आपले प्राण पणाला लावले. या चळवळीने मराठी भाषेला आणि संस्कृतीला एक नवीन ओळख दिली, आणि आज महाराष्ट्र हे भारतातील एक प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. म्हणूनच शाळा, कॉलेजेस, सरकारी संस्था या ठिकाणी विशेष परेड, संस्कृतिक कार्यक्रम, झेंडावंदन आयोजित केले जाते. या दिवशी महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी बलिदान केलेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण केली जाते. हा दिवस संपूर्ण महाराष्ट्र आणि जगभरात पसरलेले सर्वच महाराष्ट्रीयन लोक मोठ्या उत्साहात, आनंदाने आणि अभिमानाने साजरा करतात. महाराष्ट्राची सांस्कृतिक संपन्नता ही त्याच्या विविधतेतून दिसून येते. गणेश चतुर्थी, दहीहंडी, आणि पंढरपूरची वारी यांसारखे सण, लावणी आणि पोवाडे यांसारखी नृत्यकला, पुरण पोळी, मिसळ पाव, वडापाव यांसारखी खाद्यसंस्कृती ही महाराष्ट्राची ओळख आहे. हा दिवस मराठी साहित्य आणि कलेचाही सन्मान करतो, ज्यामध्ये संत ज्ञानेश्वर, तुकाराम, आणि कुसुमाग्रज यांसारख्या साहित्यिकांचे योगदान मोलाचे आहे. महाराष्ट्र दिनासोबतच १ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणूनही ओळखला जातो. कामगारांच्या हक्कासाठी आणि न्याय्य वेतनासाठी सुरू झालेल्या चळवळीचा हा स्मरण दिन आहे. १८८६ साली अमेरिकेतील शिकागो शहरात कामगारांनी आठ तासांच्या कामाच्या मागणीसाठी आंदोलन केले होते, ज्याच्या स्मरणार्थ हा दिवस जगभरात साजरा केला जातो.



## दिंद्रुड येथे महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त अभिवादन

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील मन्मथस्वामी मठात महात्मा बसवेश्वर जयंती काल बुधवारी (दि३०) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी येथील वीरशैव समाजबांधव व गावातील जेष्ठ, प्रतिष्ठित नागरिकांनी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार, श्रीफळ वाढवून अभिवादन केले. क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर हे आधुनिक समाजसुधारक म्हणून जगविख्यात आहेत. बसवेश्वरांचा जन्म वैशाख महिन्यात अक्षय्य तृतीयेला झाल्याची अख्यायिका प्रसिद्ध आहे. हिंदू धर्मातील जातिव्यवस्था, अन्य हानिकारक प्रथा व रूढीच्या विरुद्ध संघर्ष केला. तसेच त्यांनी निर्गुण, निराकार एकेश्वरवादी श्रद्धेचा पुरस्कार केला. गावातील ग्रामस्थ, वीरशैव बांधवांसह विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी महात्मा बसवेश्वरांना अभिवादन केले.

## पाटोदा आगारप्रमुखांनी जामखेड ते शिरूर मुक्कामी बस सेवा सुरू करून प्रवाशांची होणारी हेडसांड थांबवली

### प्रवाशांना झाला मोठा आधार

**पिंपळवंडी । पतिनिधी**

जामखेड आगाराची ६०- ७० वर्षापासून सुरू असलेली जामखेड-शिरूर (कासार) मुक्कामी बससेवा कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे बंद झाली ती अद्यापर्यंत सुरू केली नाही. त्यामुळे कुसळंब-पिंपळवंडी-अंमळनेर-जाटनांदुर-सिंदफणा या मार्गावरील प्रवाशांची मोठी गैरसोय व अडचण होत होती.परंतु,पाटोदा आगारप्रमुखांनी या मार्गावरील प्रवाशांची होणारी गैरसोय व समस्या लक्षात घेऊन जामखेड बस स्थानक येथून सायंकाळी ४ वाजता सौताडा-वांजराफाटा-कुसळंब-पिंपळवंडी-अंमळनेर-जाटनांदुर- सिंदफणा या मार्गे शिरूर कासार मुक्कामी तर शिरूर येथून सकाळी ६:४५ वाजता जामखेड साठी बससेवा गेल्या तीन- चार दिवसापासून पूर्ववत सुरू केल्याने प्रवाशी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.सदरील बससेवा सुरू करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तसेच पत्रकारांनी विविध दैनिकातून बातम्या प्रसिद्ध करून आवाज व पाठपुरावा मोठ्या प्रमाणात केला होता.बीड विभाग नियंत्रक अनुजा देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा आगरप्रमुख



सतीश तिडके, सहाय्यक वाहतूक अधिक्षक विकास खेडकर,वाहतूक निरीक्षक निलेश बांगर यांनी ही बससेवा सुरू करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. याबद्दल या परिसरातील प्रवाशांनी समाधान व्यक्त करून राज्य परिवहन अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. अनेक वर्षापासून जामखेड आगाराची कुसळंब-पिंपळवंडी-अंमळनेर-पाथर्डी- शेवगाव मार्गे जामखेड बस स्थानकातून दुपारी २:३० वाजता सुटणारी जामखेड-पैठण बस सेवा सुद्धा कोरोनाच्या काळापासून अद्यापर्यंत बंद आहे.जामखेड आगार प्रमुख ही बससेवा पूर्ववत सुरू करण्यास असमर्थ आहेत.ही बससेवा पूर्ववत सुरू करण्यासाठी अनेक वेळा विविध माध्यमातून आवाज उठवला पण त्याचा जामखेड आगार प्रमुखावर काहीच परिणाम झालेला नाही. पाटोदा आगर प्रमुखांनी जामखेड- पैठण बस सेवा सुरू करून प्रवाशांची गैरसोय दूर करावी अशी प्रवाशी वर्गातून अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## धरणातील पाणीसाठा समाधानकारक

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील धरणातला पाणी साठा गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला असला तरीही संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन योग्य नियोजन करावे अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिल्या. सध्या अठरा जिल्ह्यातील ६४४ गावे आणि २०५१ वाड्याना ७९६ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.**

राज्याच्या अनेक जिल्ह्यात पाणी टंचाईचा प्रश्न हळूहळू गंभीर होत चालला आहे. या पार्श्वभूमीवर आज मंत्रिमंडळ बैठकीत टंचाई स्थितीचा आढावा सरकारने घेतला. राज्यातल्या धरणातील पाणी साठा आणि पाणी पुरवठा याबाबतचे सादरीकरण जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर आणि पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत केले. राज्यातील धरणातील पाणी साठा अद्यापही समाधानकारक आहे. पाणी टंचाई जाणवत असलेल्या गावांमध्ये टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे. मात्र गेल्या वर्षीच्या तुलनेत अद्याप परिस्थिती चांगली आहे. गेल्या वर्षी याच तारखेला राज्यात २५६४ टँकर सुरू होते. मात्र सध्या ७९६ टँकर सुरू आहेत. बीड जिल्ह्यात गेल्या वर्षी २६३ टँकर सुरू होते. यावर्षी मात्र अद्याप एकही टँकर सुरू करावा लागलेला नाही. मात्र तरीही संभाव्य परिस्थिती गृहीत धरून पाणी पुरवठा बाबतचे नियोजन करावे असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्यात सद्यस्थितीत ठाणे, रायगड, पालघर, नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापुर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, अमरावती, वाशिम, बुलढाणा व यवतमाळ या १८ जिल्ह्यात शेवटचा पर्याय म्हणून टँकरने ६४४ गाव आणि २०५१ वाड्यांमध्ये एकूण ७९६ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. संभाजीनगर महसुली विभागात सर्वाधिक म्हणजेच, एकूण २७५ टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे. त्याचबरोबर छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात सर्वाधिक, १९२ टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे.

## राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार बोर्डात मोठे बदल; माजी रॉ.प्रमुख आलोक जोशी बोर्डाचे नवे अध्यक्ष

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये अजूनही तणावाची परिस्थिती आहे. दरम्यान, भारत सरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळात बदल केले आहेत. माजी रॉ प्रमुख आलोक जोशी यांची अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांच्यासोबत बोर्डात एकूण ७ सदस्य असतील. तिन्ही सैन्यातील निवृत्त अधिकाऱ्यांना बोर्डात समाविष्ट करण्यात आले आहेत.**

सरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळात बदल केले आहेत आणि मंडळाची कमान माजी रॉ प्रमुख आलोक जोशी यांच्याकडे सोपवली आहे. माजी वेस्टर्न एअर कमांडर एअर मार्शल पीएम सिन्हा, माजी दक्षिणी आर्मी कमांडर लेफ्टनंट जनरल ए.के. सिंग आणि रिअर ॲडमिरल मोंटी खन्ना हे लष्करी सेवेतील निवृत्त अधिकारी आहेत. हे देखील मंडळाचा भाग असतील. राजीव रंजन वर्मा आणि मनमोहन सिंग हे भारतीय पोलिस सेवेतून निवृत्त झाले आहेत. बी व्यंकटेश वर्मा हे सात सदस्यांच्या मंडळावर निवृत्त परराष्ट्र सेवा अधिकारी आहेत. दरम्यान, बुधवारी



पंतप्रधान मोदींनी चार प्रमुख बैठकांमध्ये भाग घेतला. त्यांनी सीसीएस, सीसीपीए, सीसीईए आणि मंत्रिमंडळाच्या बैठकांचे अध्यक्षपद भूषवले. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदींनी आतापर्यंत अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. यामुळे पाकिस्तान घाबरला आहे. पाकिस्तानने अलीकडेच रशिया, अमेरिका आणि तुर्कीशी चर्चा केली. त्यांनी संयुक्त राष्ट्रांना सांगितले की भारताचे आरोप निराधार आहेत.

## मोदी सरकारची प्रत्येक योजना म्हणजे 'नाव मोठे, लक्षण खोटे' -उध्दव ठाकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

**मोदी सरकार जाहीर करीत असलेली प्रत्येक योजना आतापर्यंत 'नाव मोठे, लक्षण खोटे' अशीच ठरली आहे. राज्याचे अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांची 'जलजीवन योजना आजच्या घडीला पूर्णपणे फेल झाली असून त्यामुळे ग्रामीण जनतेला, आदिवासींना सध्याच्या पाणीटंचाईच्या काळात पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे,' अशा शब्दांत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी मोदी सरकारच्या 'ड्रीम प्रोजेक्ट'चे वस्त्रहरण 'सामना'मधून केले आहे.**

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी योजना जाहीर करताना बतावणी तर खूप करतात. देशात आता क्रांतीच होणार, असाच त्यांचा आव असतो. जनतेसमोर चित्रदेखील तसेच उभे केले जाते; परंतु प्रत्यक्षात ती योजना सर्वसामान्यांसाठी 'नाव सोनूबाई हाती कथलाचा वाळा'च ठरते. मोदी सरकारच्या प्रत्येक योजनेची अवस्था हीच झाली आहे. अशा 'फेल' योजनांमध्ये आता आणखी एका योजनेची भर पडली आहे. 'जलजीवन मिशन' असे या योजनेचे नाव आहे आणि या मिशनचा ढोल महाराष्ट्राच्या एका मंत्रिमहोदयांनीच फोडला आहे, अशी टीका ठाकरे यांनी मोदी सरकारवर केली आहे. राज्याचे अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांची 'जलजीवन योजना आजच्या घडीला पूर्णपणे फेल झाली असून त्यामुळे ग्रामीण जनतेला, आदिवासींना सध्याच्या पाणीटंचाईच्या काळात पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे.

## खंडणीखोरांना राजाश्रय मिळत असल्याने राज्यात गुंतवणुक नाही-पृथ्वीराज चव्हाण

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रात खंडणीखोरांना राजाश्रय मिळत असल्याने राज्यात सहा जिल्हे वगळता अन्यत्र उद्योजक गुंतवणूक करण्यास पुढे येत नाहीत. याचा परिणाम बेरोजगारीवर होत आहे. सध्या महाराष्ट्र राज्य हे खंडणीखोरांचे राज्य झाले आहे आणि त्याला राजाश्रय मिळत असल्याचा घणाघात माजी मुख्यमंत्री तथा राज्यातील ज्येष्ठ काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला.**

चव्हाण म्हणाले की, एकही मोठा उद्योग महाराष्ट्रामध्ये येत नाही. उद्योगात एक नंबरवर असलेले राज्य आज त्या नंबरवर राहिलेले नाही. त्यामुळे उच्च दर्जाची गुंतवणूक होत नाही आणि त्याने रोजगार मिळत नाही. यावर राज्य सरकारने मुख्यमंत्री कार्यालयात खंडणीखोरांविरूध्द कक्ष स्थापन करून याला पायबंद घातला पाहिजे. मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक आणि रायगड वगळता अन्य जिल्ह्यात नवे उद्योग उभा राहात नाहीत. याला कारण खंडणीखोरी आहे. खंडणीखोरीला राजाश्रय



मिळत असल्याने ही प्रवृत्ती फोफावली आहे. विकसित सहा जिल्ह्यातच राज्याचे ७५ टक्के उत्पन्न मिळते, मात्र, अन्य जिल्ह्यांचा विचार व्हायला हवा, यासाठी खंडणीखोरीला आळा बसला पाहिजे. केवळ रस्ते बांधकाम केले तर प्रगती झाली असे म्हणता येणार नाही. समृध्दी येणे महत्वाचे आहे. दरडोई उत्पन्नामध्ये राज्य आता अकराव्या नंबरवर पोहचले आहे. राज्य सरकार अडचणीत असून सत्तेवर असलेल्या तिन्ही पक्षात अंतर्गत बेबनाव आहे, असे ते म्हणाले.

## पान १वरून...

### उसाच्या एफआरपीत

बुधवारी (दि.३०) केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत एफआरपी वाढीसंदर्भात निर्णय घेण्यात आला. २०२४-२५ च्या गाळप हंगामात १०.२५ टक्के उताऱ्यासाठी उसाला ३४० रुपये प्रतिक्विंटलची एफआरपी होती. आता २०२५-२६ च्या हंगामात (ऑक्टोबर २०२५ ते सप्टेंबर २०२६) उसाला ३५५ रुपये एफआरपी मिळणार आहे. म्हणजेच मागील हंगामाच्या तुलनेत १५ रुपयांची वाढ करण्यात आली. साखर उतारा १०.२५ टक्क्यांपेक्षा जास्त असेल तर प्रत्येक ०.१ टक्क्यामागे ३.४६ रुपये जास्त एफआरपी मिळेल. तसेच १०.१५ टक्क्यांपेक्षा उतारा कमी असेल तर प्रत्येक ०.१ टक्क्यामागे ३.४६ रुपये कमी एफआरपी दिली जाईल, असाही निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. उसाच्या उत्पादन खर्चावर १०५ टक्के अधिक एफआरपी जाहीर केल्याचा दावा केंद्राने केला. उसाचा २+ सुत्रानुसार उत्पादन खर्च क्विंटलला १७३ रुपये येतो. पण केंद्राने १०.२५ टक्के उताऱ्यासाठी ३५५ रुपये प्रतिक्विंटल एफआरपी जाहीर केली. म्हणजेच उत्पादन खर्चावर १०५ टक्के नफ्यासह एफआरपी जाहीर केली, असाही दावा केंद्राने केला आहे.

-----------

### पहलगामधील हल्ला हा

तशीच भूमिका घेतली आहे. त्याच भूमिकेवर आम्ही पुढे जाणार असल्याचा दावा देखील शरद पवार यांनी केला आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे आगामी काळात एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या संदर्भात दोन्ही पक्षांच्या नेत्यांनीच संकेत दिले आहेत. यावर देखील शरद पवार यांना प्रसार माध्यमांनी प्रश्न विचारला असता ते म्हणाले, दोन कुटुंब एकत्र येत असतील तर आनंदच आहे. मात्र या संबंधित भाष्य करण्याचा सध्या प्रसंग नसल्याचे शरद पवार म्हणाले.

-----------

### मोठा निर्णय;जातनिहाय जनगणनेचे

जनगणना केली जावी अशी मागणी केली जात होती. याच मागणीबाबत आता केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने आगामी जगणननेसोबतच जातीनिहाय जनगणना करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाची २३ एप्रिल रोजी बैठक झाली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. याच निर्णयांमध्ये जातिनिहाय जनगणनेच्याही निर्णयाचा समावेश आहे. मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या बैठकीत काय-काय झाले, याचा आढावा माध्यमांसमोर मांडला. यावेळी त्यांनी केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती दिली.

-------

### पुढचे आमरण उपोषण मुंबईत;

आहे की सगळे गुन्हे सरसकट मागे घ्या. माझ्यावर हल्ला करायचा. मला मारायचे आहे. आता मी दारात आहे देवेंद्र फडणवीस साहेब तुमच्या. मी २९ ऑगस्टला तुमच्या दारात येत आहे. तुम्हाला जे करायचे ते करा. मला फक्त २८ ला सोडायला पोरं येतील. २९ ला ते परत जातील. २८ ऑगस्टच्या आधी सगळ्या मागण्या मंजूर झाल्या पाहिजेत. आमच्या संयमाचा अंत बघू नका फडणवीस साहेब, असे जरांगे म्हणाले.

-----------

### प्रधानमंत्री आवास योजनेच्या

असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेसाठी सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करून घ्यावी, नोंदणी करण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ मिळालेली आहे. १५ मे ही शेवटची तारीख असून त्या अगोदरच बीड मतदारसंघातील पात्र नागरिकांनी आपली नोंदणी करुन घ्यावी असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

**अशाप्रकारे करावा सेल्फ सर्व्हे**

सेल्फ सर्व्हे करण्यासाठी आवास प्लस- २०२४ हे शासनाचे अधिकृत प्ले-स्टोअरवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टॉल करावे, नंतर आधार फेस आरडी हे ॲप देखील इंस्टॉल करुन घ्यावे, त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून ॲपवर विचारलेली माहिती भरावी, शेवटी आपल्या कच्च्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा, आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा.

**अडचण असल्यास संपर्क साधावा**

घरकुल सेल्फ सर्व्हेच्या प्रक्रियेत कोणत्याही टप्प्यावर अडचण असल्यास आपल्या ग्रामसेवक / ग्रामपंचायत अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच काही तांत्रिक अडचण असल्यास १८००-११०-१११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क करावा. यासोबतच प्रशासनासंबंधित काही तक्रार असल्यास किंवा आर्थिक मागणी होत असल्यास ९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

---------

### अखेर समता परिषदेच्या ३२ वर्षांच्या

क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले यांच्या पुळ्याजवळ फटाके वाजवून आणि पेढे वाटून या निर्णयाचे स्वागत करण्यात आले. जातनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी १९९२ पासून अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या माध्यमातून सातत्याने विविध आंदोलने आणि पाठपुरावा करण्यात आलेला आहे. दिल्ली, पटना, राजस्थान, हजारीबाग, सतना, भोपाळ, गोवा, हैदराबाद आदी ठिकाणी झालेल्या अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या महामेळाव्यामध्ये माननीय छगनराव भुजबळ साहेबांनी देशातील ओबीसींची जात निहाय जनगणना व्हावी अशी जोरदार मागणी केली होती. २०१० मध्ये जातनिहाय जनगणना करण्यासाठी समता परिषद सुप्रीम कोर्टामध्ये गेली होती, त्याचवेळी तत्कालीन खासदार समीर भुजबळ यांच्या माध्यमातून संसदेत जोरदारपणे ही मागणी मांडली. त्यावेळी माजी केंद्रीय मंत्री स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब खंबीरपणे पाठीशी उभे राहिले. त्यानंतर देशाभरातील तब्बल १०० खासदारांचा भक्कम पाठिंबा मिळाला. या पाठपुराव्याचा परिणाम म्हणून तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री स्व. प्रणव मुखर्जी यांनी जातनिहाय जनगणनेची घोषणा केली. परंतु तेव्हा नगरविकास व ग्रामविकास खात्यामार्फत केवळ सर्वेक्षण करण्यात आले. नंतरच्या काळात देशात मोदी सरकार आल्यानंतर पुन्हा या मागणीसाठी ओबीसीचे नेते राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ साहेब यांनी पाठपुरावा सुरु केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे देखील पत्राद्वारे, तसेच व्यक्तिगतरीत्या ही मागणी मांडली होती. आता संपूर्ण देशात जातनिहाय जनगणना होणार असल्याने ही संपूर्ण देशातील सर्व प्रवर्गातील मागास घटकांसाठी आनंदाची बाब आहे. जेव्हा जेव्हा ओबीसींना काही देण्याची वेळ येते, तेव्हा त्यांना त्यांची संख्या विचारली जाते. त्यामुळे महाराष्ट्रात तब्बल ३७४ जातींचा मोठा समूह असलेल्या ओबीसी प्रवर्गाला आहे त्या आरक्षणाचाही पुरेसा लाभ मिळालेला नाही. या प्रवर्गातील अनेक दुर्लक्षित जातसमूह अद्याप विकासापासून वंचित आहेत. ओबीसींसह अन्य सर्व जातसमूहांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य आरक्षण मिळण्यासाठी, सर्व समाजघटकांची खरी संख्या समजण्यासाठी आणि त्यांना हक्काचा वाटा मिळवून देण्यासाठी जातनिहाय जनगणना अतिशय गरजेची आहे. जातनिहाय जनगणना झाल्यानंतर सर्वच प्रश्न सुटतील आणि गेल्या अनेक वर्षांपासून विविध क्षेत्रात ओबीसींचा असलेला बॅकलॉग भरून काढण्यासह सर्वांना योग्य न्याय मिळेल. त्यामुळे केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयाचे स्वागत देशातील तमाम ओबीसी मानवांच्या वतीने करण्यात येत आहे. बीड जिल्हा समता परिषदेच्या वतीने या निर्णयाचे स्वागत क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले यांच्या पुळ्याजवळ फटाके वाजवून आणि पेढे वाटून करण्यात आले. यावेळी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत, परीट समाजाचे नेते गणेश जगताप, माळी महासंघाचे नेते प्रा. लक्ष्मण गुंजाळ, सोनार समाजाचे नेते ॲड. संदीप बेदरे, धनगर समाजाचे नेते रणजीत सोन्नर, समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन साखरे, शहराध्यक्ष निखिल शिंदे, युवा नेते नितीन राऊत, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष अजिंक्य सुरवसे, मोहनराव गोरे, महेश व्यवहारे, निलेश राऊत, पांडुरंग सत्वधर, अजय काळे, रोहित जमदाडे, मंगेश जमदाडे, महेश चौधरी आदींसह समता सैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

-----------

## टी.सी.हरवला आहे

अभिषेक विलास मकाळ रा. वैद्यकिन्ही ता. पाटोदा जि. बीड यांचा १० वी पासचा टी.सी. पाटोदा ते मांजरसुंबा या प्रवासादरम्यान हरवला आहे. तरी ज्या कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**संपर्क::९३५६३५११२५**

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. ०१ मे २०२५



## त्रिंबकेश्वर दर्शनासाठी गेलेल्या युवकाचा गोदावरीत बुडून मृत्यू

अंबाजोगाई । प्रतिनिधी

त्रिंबकेश्वर दर्शनासाठी गेलेल्या अंबाजोगाई तालुक्यातील राडी येथील मुळे कुटुंबावर शोककळा पसरली आहे. राडी येथील मुळे कुटुंबीय देवदर्शनसाठी नाशिकला गेले होते. मंगळवारी (दि. ३० एप्रिल) सायंकाळी ५ वाजता बालाजी रामभाऊ मुळे हा युवक



नाशिकच्या पवित्र रामकुंडावर गेला असता, त्याचा पाय घसरल्याने तो थेट गोदावरी नदीत पडला आणि क्षणार्धात जोरदार प्रवाहात वाहून गेला.

त्यावेळी गोदावरी नदीत सुमारे १ हजार क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू होता. घटनेनंतर प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. रात्री उशिरापर्यंत शोधमोहीम सुरू होती, मात्र अंधार आणि वेगवान प्रवाहामुळे अडचणी आल्या. त्यामुळे बालाजीचा काहीही थांगपत्ता लागला नव्हता. बुधवारी (दि. १ मे) सकाळपासून पुन्हा एकदा शोधमोहीम राबवण्यात आली. अखेर काही तासांच्या अथक प्रयत्नांनंतर बालाजीचा मृतदेह सापडला. बालाजी अंबाजोगाई येथील केशकर्तनालयात काम करत असे. या दुर्घटनेमुळे राडी गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# धुळीच्या त्रासाला पाटोदेकर वैतागले

## गेल्या चार-पाच वर्षांपासून सुरू झालेले काम संपणार तरी कधी?

पाटोदा । प्रतिनिधी

**पाटोदा शहरातून जाणारे पैठण - पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाचे काम अतिशय मंद गतीने सुरू असून हे कामे गेल्या चार-पाच वर्षांपासून चालू असून हे कामे मंदगतीने चालू असल्यामुळे अनेकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, या कामामुळे धूळ उडत असल्याने नागरिक वैतागले आहेत. या धुळीमुळे श्वसनाचे आजार जडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच भाजीपाला, हॉटेल मधील खाद्यपदार्थ धूळ साचत असल्याने कोणी खरेदी करीत नसल्याने त्यांच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे. यामुळे या रस्त्याचे काम पूर्ण होणार तरी कधी असा प्रश्न येथील नागरिकांमधून विचारला जात आहे.**

पैठण - पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ डी. हा महामार्ग पाटोदा शहरातून जात आहे. या महामार्गाचे काम मागील काही चार ते पाच वर्षापासून सुरू असून, सध्या शहरातील मुख्य बाजारपेठीतल मात्र रस्ता फक्त खोदून ठेवला आहे. तर पर्यायी मार्ग काढण्यासाठी दुसरा लस्ताही नाही. यामुळे या खोदून ठेवलेल्या रस्त्यावरून वाहतूक सुरू आहे. याचा त्रास मागील अनेक दिवसांपासून शहरातील नागरिक सहन करीत आहेत. सध्या



उन्हाळा असल्याने धूळीचे प्रमाण वाढले आहे. यावर संबंधित कंपनी पाणीही मारीत नसल्याने येथे २४ तास धुळीचे लोट दिसू येतात. या नेहमीच्या धुळीमुळे रस्त्यालगत रहाणाऱ्या नागरिकांचा श्वास गुदमरत आहे. श्वसनाचे आणि त्वचेचे आजार जडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही धूळ भाजीपाला आणि हॉटेल मधील खाद्यपदार्थ साचत असल्याने त्यांच्याही व्यवसायावर परिणाम झाला आहे. यामुळे त्यांच्याही पुढे घर चालवायचे कसे असा प्रश्न निर्माण झाला असल्याचे सांगितले जात आहे. नविन पाटोदा आणि जुन्या पाटोद्याला जोडणारा वाजरा नदीवरील पूल सततच खड्डे आणि त्यावर टाकलेले माती मुरूम लोकांना अपघाताचे आमंत्रण दिले जात असल्याचे दिसते. यामुळे या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे अशी मागणी नागरिकांमधुन करण्यात येत आहे.नसता रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल असे येथील नागरिकांन मधून बोलले जात आहे. पाटोदा शहरात मुख्य पुलावरून जाणाऱ्या वाहनांची संख्या खूप आहे सध्या या पुलावर मुरूम टाकलेला आहे त्यामुळे धुळीचा खूप त्रास होत आहे धुळीमुळे आलर्जी होण्याची शक्यता नाकरता येत नाही य''संध्याकाळी ग्राहकच दुकानात येईनासे झाले आहेत, त्यामुळे व्यवसायावर परिणाम होतोय.'' ''घुळ्यांच्या त्रासामुळे दुकानात बसायलाही त्रास होतो, ''ग्राहक दुकानात येतात पण घाईघाईने खरेदी करून निघून जातात.'' ''रात्री उशिरापर्यंत दुकान उघडे ठेवणे शक्य नाही, घुळी असह्य होतात.'' ९. ''घुळीमुळे दुकानात स्वच्छताही राखणे अवघड झाले आहे.'' ''प्रशासनाने तात्काळ पावले उचलली नाहीत, तर व्यापाऱ्यांना आंदोलन करावे लागेल.

## महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेची पाटोदा तालुका कार्यकारिणी जाहीर

पाटोदा । प्रतिनिधी

विद्युत क्षेत्रातील अनेक कर्मचारी, बाह्य स्रोत कर्मचारी यांच्या अडचणी सोडवण्यासाठी त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहून मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेनी विद्युत क्षेत्रात महत्त्वाचे स्थान मिळवले आहे. अडचणीच्या काळात कर्मचाऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहून कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास न ढळता न्याय मिळवून देण्याचे काम या संघटनेमार्फत कायम घडत आले आहे. आणि याच विश्वासावर संघटनेमध्ये अनेक कर्मचारी यांनी जाहीर प्रवेश करत विविध पदावर स्थान मिळवले आहे.

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या पार पडलेल्या कार्यकारिणीत पाटोदा तालुका अध्यक्षपदी मा. ऋषिकेश



गवळी, उपाध्यक्ष. मा. श्याम माने,. सचिव मा. भागवत गोपाळघरे यांची निवड करण्यात आली आहे. कंपनी व कामगार हित, सामाजिक औद्योगिक शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी, व उद्भवणारे अन्यायकारक प्रश्न परिस्थिती सोडवण्यासाठी संघटना कार्यकर्ते त्या उद्देशाने आपल्या प्रशासनाची पत्रव्यवहार चर्चा, वेळप्रसंगी आंदोलन करून प्रश्न मार्गी लावण्याकरिता आपल्या निवडी केल्या आहेत.असा विश्वास यावेळी व्यक्त केला. संघटनेचे अधिकार पत्र श्री. सावकारे साहेब उपकार्यकारी अभियंता यांना देताना बीड विभाग अध्यक्ष श्री. विकी वाघमारे, व जेष्ठ सहकारी श्री अनिल काळुशे,श्री .महेश भोंडवे, व श्री. हजारे उपस्थित होते.यावेळी नवीन सदस्याचे चे अभिनंदन करून व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## व्ही.व्ही. भावठाणकर यांचा सेवागौरव सोहळा उत्साहात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील यो.शि.संस्था संचलित योगेश्वरी नूतन विद्यालयाचे पर्यवेक्षक तथा गणित विषयाचे निष्णात अध्यापक व्ही.व्ही.भावठाणकर हे शासकीय वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.त्यांच्या सेवेचा यथोचित गौरव योगेश्वरी नूतन विद्यालयाच्या वतीने उत्साहात संपन्न झाला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष जी.बी.व्यास, सचिव कमलाकर चौसाळकर, सल्लागार एन.के.गोळेगांवकर,एम .एस.लोमटे, संचालक ॲड.के.जे. विर्धे,आर. व्ही. सोनवळकर, सय्यद पाशुमियाँ,एल.जी.वैद्य, मुख्याध्यापिका ए.आर. पाठक,सत्कारमुर्ती




व्ही.व्ही.भावठाणकर, कुंदा भावठाणकर आदी उपस्थित होते. भावठाणकर यांनी आपल्या सेवाकालात संस्थेतील तसेच विद्यालयातील विविध जबाबदाऱ्या सक्रियपणे सांभाळल्या.तसेच सहकारी व संस्थेविषयी स्नेहभाव जोपासून तळमळीने कार्य केले एक उत्तम अध्यापक कसा असावा याचे उदाहरण म्हणजे व्ही.व्ही. भावठाणकर होय तो आदर्श इतरांनी घ्यावा असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. योगेश्वरी शिक्षण संस्थेतील शिक्षकांनी अध्यापन कौशल्य जपल्यानेच विद्यार्थी घडले त्यांचा सर्वांगिण विकास झाल्याचे चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते भावठाणकर यांच्या सेवेचा यथोचित सपत्नीक गौरव करण्यात आला. उपस्थितांचे स्वागत विद्यालयाच्या वतीने करण्यात आले प्रास्तविक मुख्याध्यापिका ए.आर. पाठक यांनी केले, संचालन एम.के. कुलकर्णी आभार व्ही.के.गायकवाड यांनी मानले. यावेळी शिक्षक कर्मचारी इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवीन जिल्हाधिकाऱ्यांकडून बीडकरांचा पूर्ण अपेक्षा भंग -प्रा. डी.जी. तांदळे

बीड । प्रतिनिधी

**बीड शहर बचाव मंचाचे प्रमुख मार्गदर्शक कॉ. प्राचार्य डी.जी. तांदळे सर, नितीनजी जायभाये, कॉम्रेड सुधीर देशमुख, डॉक्टर संजय तांदळे, रूपालीताई देशपांडे, ॲड. अनिल बारगजे, ॲड.नितीन वाघमारे, हाफिज मोईनुद्दीन शेख शहर काझी, बीएसपी चे जि. अध्यक्ष प्रशांत वासनिक, संपादक-पत्रकार नितेश उपाध्ये, बाजीराव ढाकणे आधी सहकार्यांनी नवीन जिल्हाधिकारी साहेबांची भेट घेतली. बीड शहरातील अतिशय उग्र स्वरूप धारण करू लागलेली भीषण पाणीटंचाई व इतर अनेक गंभीर प्रश्न-गंभीर समस्या,व शहरातील नागरिकांचे त्या अनुषंगाने चाललेले हाल त्यांच्यासमोर पोट तिडकीने मांडले.**

नवीन जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी पदभार स्वीकारल्यानंतर बीड जिल्ह्याचा कारभार जनताभिमुख करणार असां काहीसा भास निर्माण करण्यात आला होता. त्या अनुषंगाने त्यांनी जनता दरबाराचे आयोजन केलेले आहे. काल दुसऱ्याच दिवशी जनता दरबार केवळ फार्स वाटावा इतपत बीडकरांचा अपेक्षाभंग झाला आहे असे असे कॉ. प्रा. डी.जी. तांदळे यांनी सांगितले आहे. जनता दरबाराच्या नाट्य बद्दल अधिक माहिती देताना तांदळे सर यांनी सांगितले की, जनतेचे घराणे मांडताना प्रामुख्याने बीड नगर परिषदेचा गलथान, भ्रष्ट, मनमानी, बेपर्वा कारभार विशेषतः पाणीपुरवठा, भीषण पाणीटंचाई, स्वच्छता, धानोरा रोड, नगर रोड



वरील युटर्न यासंबंधी मांडणी करताना कलेक्टर महोदय केवळ काही तांत्रिक व थातूरमातूर प्रतिसाद देत असताना जनतेचा अपेक्षा भंग करीत असल्याचे पुन्हा पुन्हा दिसुन येत होते. नगरपरिषद अस्तित्वात नसल्याने मुख्याधिकारी, अधिकारी, कर्मचारी ठराविक कंत्राटदार, प्रभावी राजकारणी यांचे पावले आहे. हे सगळे बेताल झालेले आहेत. जनतेच्या समस्या भीषण होत चाललेल्या आहेत. मुख्याधिकारी नीता अंधारे व काही कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करावे, नसता बदली करावी अशी आग्रहपूर्वक मागणी बीड शहर बचाव मंचाने केलेली आहे. परवा विभागीय आयुक्तांनी घेतलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग मीटिंगमध्ये देखील जनतेच्या आवश्यक रास्त तातडीच्या मागण्या बीड शहर बचाव मंचाने मांडल्या आहेत. जनता दरबारासाठी नागरिकांना जिल्हाधिकारी साहेबांची तीन तास प्रतीक्षा करावी लागली. जनतेच्या समस्या ऐकण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहून निवेदने वगैरे स्वीकारणार अशी माहिती प्रस्तुत झाल्याने विविध संघटना, पक्ष, युवा कार्यकर्ते, व्यापारी, जेष्ठ नागरिक, पत्रकार, डॉक्टर, विधीज्ञ, प्राचार्य, काझी, सामाजिक कार्यकर्ते, महिला असे दोनशेच्या वर लोक प्रतिनिधिक स्वरूपात मोठ्या संख्येने जमा झाले होते. भर उन्हाळ्यात उष्णतेच्या लाटेमध्ये हॉलमध्ये लोकांची गैरसोय झाली होती. कसल्याही प्रकारची पिण्याच्या पाण्याची व पंख्याची व्यवस्था केलेली नव्हती. पुरेशा खुर्च्या व बसण्याची व्यवस्था नसल्यामुळे अनेक लोक ताटकळत उभे राहूनच जनता दरबार करत होते. जिल्हाधिकारी साहेबांच्या या वागण्यावर बीड शहर बचाव मंचाने तीव्र असंतोष व्यक्त केला. त्यानंतर जिल्हाधिकारी साहेब यांनी तीन तासानंतर जनता दरबाराकडे धाव घेतली. जनता दरबार कशासाठी व कसा असतो हेच त्यांना स्वतःला अजून ही माहित नाही हेच निदर्शनास आले. जनता दरबारासाठी आलेले विविध क्षेत्रातील शंभराहून अधिक लोक संताप व्यक्त करत निघून गेले. . जिल्हाधिकारी साहेबांनी घोषित केलेल्या फसव्या जनता दरबाराचा त्यांच्याच अवस्थेमुळे फज्जा उडालेला दिसून आला.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृत नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी कळंब येथे कॅण्डल मार्च




कळंब । प्रतिनिधी

दक्षिण काश्मीरमधील पहेलगाम येथे २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या केलेल्या भ्याड हल्ल्यात पर्यटनासाठी गेलेल्या २८ नागरिकांचा मृत्यू झाला आहे या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक महासंघ कळंब व सकल कळंबकर नागरिकांनी दिनांक २७ एप्रिल रोजी संध्याकाळी ७.०० वाजता कळंब शहरातून कॅन्डल मार्च काढला यावेळी अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यात आला व घोषणा देण्यात आल्या या मार्च मध्ये सर्वधर्मीय नागरिकांचा सहभाग होता कॅण्डल मार्चला हुतात्मा




स्मृती स्तंभ नगरपरिषद कार्यालया समोरून सुरुवात झाली अहिल्याबाई होळकर चौक, मेनरोड, सराफालाईन , डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मार्गे हुतात्मा व स्मृतीस्तंभ येथे पोहोचल्यानंतर पहेलगाम येथे अतिरेक्याने केलेल्या अमानुष गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटक नागरिकांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून पुष्पअर्पण करून मेणबत्ती लावून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली व राष्ट्रगीत गायन केले या कॅण्डल मार्चमध्ये महादेव महाराज अडसूळ, प्रा. डॉ. संजय कांबळे, मुसादेक काझी, अतुल गायकवाड, रवी नरहिरे, मकरंद पाटील, प्रकाश भडंगे, ॲड, त्रंबकराव मनगिरे, सतपाल बनसोडे,माधवसिंग राजपूत, भिकचंद लोढा, सुरेश टेकाळे,बाळासाहेब कथले, यश सुराणा, मंगेश यादव, प्रदीप यादव, संदीप कोकाटे, अशोक चोंदे, निर्भय घुले,पद्माकर माने,सचिन क्षिरसागर, श्रीकांत कुलकर्णी, शिवाजी गीड्डे, सतीश खिंवसरा , राजेंद्र बिक्कड, मकसूद शिकलगार ,अनिस बद्रुद्दीन शेख,ज्योती सपाटे, संगीता पांचाळ, सलमा सौदागर, दत्ता गायकवाड, टी. जी. माळी ,यशवंत हौसलमल,संतोष भांडे, अमन शेख, वाजेद तांबोळी, बशीर पठाण,पांडुरंग माळवदे, बापू भंडारे, बबनराव वाघमारे, बाळासाहेब हौसलमल यांच्यासह नागरिकांचा समावेश होता

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यामंदिर शिष्यवृत्ती परीक्षेत बाजी

**कळंब । प्रतिनिधी**

शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यामंदिर शाळेतील तीन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करीत तीनही विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यामंदिरात इयत्ता पाचवीच्या वर्गात शिकत असलेल्या श्रेया सांगळे व विराज खंडागळे या दोन विद्यार्थ्यांनी तर आठवीची आठवीच्या वर्गातील सिद्धा पठाण या एका विद्यार्थिनीने शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये एस संपादन केले आहे. मागच्या अनेक वर्षापासून कळंब शहरातील शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक मिळवलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर शाळेने स्पर्धा परीक्षेतील आपले सातत्य कायम राखले आहे. सदरील विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव राहुल सोनवणे, मुख्याध्यापक वैजनाथ चौधरी यांच्यासह शरद पवार, प्रवीण तांबडे, कल्याण चौधरी, अमोल धस ,अभिजीत राऊत, उदय सिरसट इत्यादी कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## पान ६ वरून...

### पंढरी येथील उद्यान विकासाचे

परळी यांना नियमबाह्य वितरित केला आहे सदर प्रकरणी सखोल चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे. गोचीड निघून किंवा गळून पडतो पण राऊत मॅडम काही पदभार सोडायला तयार नाहीत... श्रीमती उज्वला राऊत अ.का. लेखा विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे कार्यरत ठिकाण असून अतिरिक्त स्वरूपात अ.का. नगर विकास विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीड या ठिकाणी असून गेल्या १३ वर्षापासून त्या एकाच ठिकाणी कार्यरत आहेत बदली अधिनियम २००५ स्पष्ट उल्लंघन होत असताना दिसून येत आहे करिता त्यांची बदली त्वरित करण्यात यावी. यांच्या कार्य काळामध्ये खूप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे त्यामुळे त्या चार्ज सोडत नसल्याची ही चर्चा सुरू आहे. त्यांच्या कार्यकाळातील सर्व कामांची निधी वितरण व प्रशासकीय मान्यतेची सखोल चौकशी होणे अपेक्षित आहे. -अजय सरवदे,जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड

### उसाचे थकीत बिले तात्काळ द्या

अन्यथा कारखान्यांना टाळे ठोकण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनाव्दरे दिला आहे.या निवेदनावर भाई ॲड.नारायण गोले पाटील, भाई मुंजा पांचाळ, भाई श्रीराम शेवाळे, भाई राहुल सोळंके, भाई उल्हास घाटुळ, भाई सुदाम चव्हाण, भाई माऊली चंदनशिव, भाई साळुजी हांडे, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई राजेश्वर मोरे, भाई सुभाष थोरात,भाई कडाजी नावडकर आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### प्राथमिक पदवीधर शिक्षकांचे उपोषण

अधिकारी आदित्य जीवने यांनी शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांच्याद्वारे शिक्षकांना निरोप पाठवला आणि त्यानंतर उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले. या भेटीदरम्यान आनंद पिंगळे, सुमंत खांडे, विजय खोसे, सुमेध जोगदंड, दिपक घाटे, विकास गवते, दिलीपकुमार सानप, जितेंद्र सांगळे, निलेश चव्हाण यांच्यासह शिक्षक बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, शिक्षकांनी आपल्या मागण्यांकडे शासनाने तत्काळ लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

### युसूफवडगाव येथे महात्मा

विकास जाधव,गणेश कोरसळे,शाम रोडगे,शिवकुमार कोरसळे,राजु गायके,नागनाथ मुकदम,पत्रकार बाळासाहेब लामतुरे, काशीनाथ खरबड,ओमकार लामतुरे,सिदु डोंगरे,जयराज मुकदम यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व महात्मा बसवेश्वर महाराज जयंती उत्सव समितीचे सर्व सभासद उपस्थित होते.

### जगातील सर्वश्रेष्ठ राज्यघटना

बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेऊन, संविधानाने मिळवून दिलेल्या हक्कामुळे आयपीएस,आयएएस अशी उच्चपदे भूषवली आहे.पुढे बोलताना ॲड.तांदळे म्हणाले की,आपल्या जयदत्त नगर व बाकीच्या गावपरिसरातील जे काही विकासाचे प्रश्न प्रलंबित आहेत ते आपण ना.पंकजाताई च्या माध्यमातून शंभर टक्के पूर्ण करू.गल्ली ते दिल्ली आज आपले सरकार आहे त्यामुळे चांगल्या आणि सकारात्मक कामाला आपल्याला कसल्याही प्रकारची अडचण येणार नाही.या कार्यक्रमास लहू लगड सर, गणेश म्हेत्रे सर, दलीत पँथर जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे,सचिन तिपटे, गणेश प्रभू पवार,महादेव उद्धव ओव्हाळ,राहुल कचरू कांबळे,प्रभू नामदेव पवार,सतीश दशरथ सोळुंके,सागर सुरेश सोळुंके,अशोक गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते या सुंदर कार्यक्रमाचे आयोजन विकास वाव्हळ यांनी केले होते

### खासदार बजरंग सोनवणे

देखील नागरिकांची दुकानावर झुंबड पाहायला मिळते. धारक कुटुंबीयांचा परंपरेने सुरू असलेला केटर्सचा व्यवसाय आता आपल्या चवीने ओळखला जाऊ लागला आहे. त्यांच्या स्वादिष्ट पदार्थांची चव खासदार आणि ही चाखली आणि धारक कुटुंबीयांचं कौतुक केलं. पुन्हा एकदा खायला येऊ असं देखील सांगितलं. यावेळी माजी सरपंच शिवाजी पवार मेजर, सामाजिक कार्यकर्ते अतुल अण्णा शेलार, सरपंच किरण पवार, यांच्यासह गावातील ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते. खासदार साहेबांना यात्रेचे निमंत्रण होतं ते आज पूर्ण झालं बाबुराव धारक आमच्या कुटुंबियाकडे परंपरेने आलेला व्यवसाय आज उत्कृष्ट चवीमुळे ओळखला जात आहे. पाटोदा सह संपूर्ण बीड जिल्हा नगर जिल्ह्यातील बरेचसे नागरिक खंडोबा दर्शन गहिनीनाथ गड या ठिकाणी दर्शनासाठी येतात आणि आल्यानंतर आमच्या स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेतल्यानंतर कौतुकही करतात बरं वाटतं आज बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी आमच्या स्वादिष्ट पदार्थांची चव चाखली आणि कौतुक केलं बरं वाटलं यात्रेला निमंत्रण दिलं होतं त्यांना वेळअभावी येता आलं नाही आज ते पूर्ण झालं बरं वाटलं... बाबुराव आण्णा धारक, मालक खंडेश्वर केटर्स कुसळंब

### पर्यावरण व वातावरणीय

वाजता आगमन व डॉ. विजय कराड यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट सायंकाळी ६.३० वाजता वाहनाने परळीकडे प्रयाण. सायंकाळी ७.०० वाजता यशश्री निवासस्थान,परळी येथे आगमन व राखीव. शुक्रवार दि. २ मे २०२५ रोजी सकाळी १०.५० वाजता वाहनाने नटराज रंगमंदिर, परळीकडे प्रयाण. सकाळी ११.०० वाजता आगमन व राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत पशुपालकांच्या एक दिवशीय कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी ७.०० वाजता यशश्री निवसस्थान परळी येथे आगमन व राखीव. शनिवार दि. ३ मे २०२५ रोजी माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव येथून वाहनाने जालनाकडे प्रयाण.

----------

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
गुरुवार, दि. ०१ मे २०२५
४

# कापूस आयात शुल्क काढण्याचा हालचाली सुरु

## सूत आणि कापड उद्योगाचे लॉबिंग



पुणे : कापूस आयातीवरील ११ टक्के शुल्क काढण्यासाठी सरकारी पातळीवर हालचाली सुरु आहेत. वस्त्रोद्योग मंत्रालयाने आपली मंजुरी दिल्याचे सांगितले जाते. आयात शुल्क काढल्यानंतर कापसाच्या दरात १० टक्क्यांपर्यंत घसरण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे देशातून सूत आणि कापड निर्यात वाढेल, असा दावा उद्योगांनी केला आहे. मात्र याचा फटका शेतकऱ्यांना तर बसेलच शिवाय सीसीआयलाही २ हजार कोटींच्या दरम्यान नुकसान सहन करावे लागेल.

चालू हंगामात आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचे भाव कमी आहेत. देशात यंदा उत्पादन घटले. कापसाचा वापर मात्र कायम आहे. त्यामुळे देशात कापसाची आयातही वाढत आहे. भारत दरवर्षी १० ते १५ लाख गाठी अतिरिक्त लांब धाग्याच्या कापसाची आयात करत असतो. कारण या कापसाचे देशात उत्पादन होत नाही. पण लांब धाग्याच्या कापसाची आयातही वाढत आहे. मात्र या कापूस आयातीवर ११ टक्के शुल्क आहे. कापूस आयातीवरील ११ टक्के आयात शुल्क काढण्यासाठी सूत आणि कापड उद्योगाने लॉबिंग सुरु केले. वस्त्रोद्योग मंत्रालयाने आयात शुल्क रद्द करण्याला परवानगी दिल्याची माहीती आहे. आता वाणिज्य मंत्रालयाकडे लॉबींग सुरु आहे. उद्योगांचे म्हणणे आहे की, देशात कापसाचे भाव जास्त आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारातील भाव कमी आहेत. त्यामुळे देशातील महाग कापसापासून निर्माण झालेल्या सूत आणि कापडाचे दरही जास्त राहत आहेत. त्यामुळे निर्यातीवर परिणाम होत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात स्वस्त कापूस देशात आला तर देशातून सूत आणि कापड निर्यात वाढेल.

देशात सध्या कापसाचे बाजारभाव स्थिर दिसत आहेत. बाजार समित्यांमध्ये कापसाला प्रतिक्विंटल सरासरी ७ हजार ४०० ते ७ हजार ८०० रुपये दर मिळत आहे. तसेच खुल्या बाजारात कापूस खंडीचे दर ५३ हजार ते ५५ हजार रुपये आहेत. भारताने आयात शुल्क काढले तर आयात कापूस ४८ हजार ते ५० हजार रुपये प्रतिखंडीच्या दरम्यान पडेल. म्हणजेच देशातील बाजारात कापसाच्या भावात १० टक्क्यांपर्यंत घसरण होऊ शकते, असा अंदाज अभ्यासकांनी व्यक्त केला.

### शेतकऱ्यांना हमीभाव द्या

आयात वाढल्याने देशात कापसाचे भाव पडण्याची शक्यता आहे. पण सध्या बहुतांशी शेतकऱ्यांनी कापूस विकला. तरीही देशात भाव पडले तर सीसीआय कापसाची हमीभावाने खरेदी करेल. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणारन नाही. सीसीआय शेतकऱ्यांच्या हीताचे रक्षण करेल, असे सीसीआयने म्हटले आहे.

### सीसीआयला फटका बसणार

देशात कापसाचे भाव पडल्यानंतर केवळ शेतकऱ्यांनाच नाही तर सीसीआयला देखील फटका बसेल. सध्या देशात सीसीआयकडेच सर्वाधिक कापसाचा स्टॉक आहे. सध्या सीसीआय कापूस खंडीची विक्री ५५ हजार ते ५६ हजार रुपयाने करत आहे. मात्र आयात खुली केल्यास आयात कापूस ४८ हजार ते ५० हजार रुपये प्रतिखंडीच्या दरम्यान आयात होईल. देशात कापसाचे भाव कमी होतील. यामुळे सीसीआयला किमान २ हजार कोटींचा फटका बसू शकतो, असे सीसीआयचे म्हणणे आहे.

# मराठवाड्यातील लघू प्रकल्पात १९ टक्के उपयुक्त पाणीसाठा



छत्रपती संभाजीनगर


मराठवाड्यातील ७५१ लघू प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा १९ टक्क्यांवर आला आहे. दुसरीकडे ७५ मध्यम प्रकल्पात २७ टक्केच तर ११ मोठ्या प्रकल्पात ४४ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती जलसंपदा विभागाच्या वतीने देण्यात आली. झपाट्याने घटत चाललेला पाणीसाठा चिंता वाढविणारा ठरतो आहे. काही भागात पाणीप्रश्न प्रचंड बिकट झाला आहे.

मराठवाड्यात गोदावरी नदीवरील १५ बंधाऱ्यात २६ टक्के उपयुक्त पाणीसाठी शिल्लक आहे. याशिवाय तेरणा, मांजरा नदीत ८९ टक्के उपयुक्त पाणी शिल्लक असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली. मराठवाड्यातील ७५ माध्यम प्रकल्पांपैकी धाराशिवमधील एक व ७५१ लघू प्रकल्पांपैकी २४ लघू प्रकल्प कोरडे पडले आहेत. कोरड्या पडलेल्या लघू प्रकल्पात बीड व धाराशिवमधील प्रत्येकी ७, जालना व लातूरमध्ये प्रत्येकी ३ व हिंगोलीतील चार लघू प्रकल्पांचा समावेश आहे. नऊ मध्यम व १८८ लघू प्रकल्पातील साठा जोत्याखाली गेला आहे. जोत्याखाली पाणीसाठा गेलेल्या १८८ लघू प्रकल्पात जालन्यातील २३, बीडमधील ५०, लातूरमधील १२, धाराशिवमधील ५४,नांदेडमधील २७, परभणी व हिंगोलीतील प्रत्येकी ११ लघू प्रकल्पाचा समावेश आहे. मध्यम ९ प्रकल्पात नांदेड व बीडमध्ये प्रत्येकी तीन, धाराशिवमधील दोन व जालन्यातील एका प्रकल्पाचा समावेश आहे.


मराठवाड्यातील माजलगाव प्रकल्पात सर्वांत कमी १८ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. सीना कोळगावमध्ये २१ टक्के, तर विष्णुपुरी प्रकल्पात ३१ टक्के, मांजरा धरणामध्ये ३२ टक्के, सिद्धेश्वर प्रकल्पामध्ये ३३ टक्के, निम्न दुधनामध्ये ३५ टक्के, जायकवाडी ४३ टक्के, उर्ध्व पेनगंगामध्ये ५१ टक्के, निम्न तेरणामध्ये ५४ टक्के तर येलदरीत ५७ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली.

# जमिनीनुसार करा खरीप पिकांसाठी खतांची निवड

पिकांना खते ही लागवडीपासून ते वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेत द्यावी लागतात. पिकांच्या विविध अवस्थेमध्ये वेगवेगळ्या अन्नद्रव्याची आवश्यकता असते. त्यानुसार खताचे व्यवस्थापन करणे फायदेशीर ठरते.मृदा परीक्षणानुसार पिकांना खते देण्याची शिफारस करण्यात येते. यामध्ये स्फुरद पालाशयुक्त खते पिकास उपलब्ध होण्यास वेळ लागतो, त्यामुळे संपूर्ण मात्रा पिक पेरणीच्या वेळेस द्यावी, तसेच आवश्यकता असल्यास त्यांच्या विद्राव्य स्वरुपातील खतांची वेळ फुलोऱ्याची वेळ, दाणे भरणे वेळेस विद्राव्य खताच्या फवारणीचे अधिक फायदे होतात. नत्रयुक्त खताचा ऱ्हास लवकर होत असल्यामुळे त्यांची आवश्यकतेनुसार दोन ते तीन भागात विभागणी करून त्याची मात्रा पिकात द्यावी.खतांची निवड :खरीप पिकांसाठी मातीचा प्रकार व पीक यानुसार खताची निवड करावी. माती तपासणीमुळे जमिनीची सुपीकता व गुणदोष याबाबतची माहिती मिळते. जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्याचे प्रमाण, जमिनीचा सामू, सेंद्रिय कर्ब, विद्राव्य क्षारांचे प्रमाण इ. नुसार कोणत्या अन्नद्रव्यांची किती गरज आहे. यांचे प्रमाण ठरवता येते म्हणजेच जमिनीचे आरोग्य समजते. बाजारामध्ये अनेक प्रकारची खते उपलब्ध आहेत. परंतु कोणत्या खतांमध्ये कोणत्या अन्नद्रव्याचे किती प्रमाण व ते कोणत्या स्वरुपात आहे हे पाहून आपल्या पिकासाठी व जमिनीसाठी योग्य आहे का हे पडताळून पाहणे आवश्यक आहे. अशा प्रकारे केलेला खतांचा वापर मूलभूत शिफारशीपेक्षा जास्त परिणामकारक ठरतो व अनावश्यक खतांचा वापर टाळता येऊ शकतो.जमीन आणि पिकांनुसार करा खतांचा वापर :पाणी साचलेल्या जमिनीत नायट्रेटयुक्त खते होत नाही. ज्या जमिनीत गंधकाचे प्रमाण कमी आहे अशा जमिनीत अमोनियम सल्फेट किंवा सिंगल सुपर फॉस्फेट या सारख्या गंधक पुरवणाऱ्या खतांचा वापर करावा. डाळवर्गीय व गळीत पिकांमध्ये गंधकाची आवश्यकता जास्त असते अशा पिकास गंधक पुरवणाऱ्या खतांचा वापर जास्त करावा. क्षारयुक्त जमिनीत युरीया वापरल्यास त्याचे नायट्रेटमध्ये रुपांतर होण्यास विलंब लागतो, परंतु नायट्रेट जमिनीत राहिल्यास पिकास अपायकारक ठरतो. म्हणून अशा जमिनीत युरिया ऐवजी अमोनियम नायट्रेट वापरावे. आम्लयुक्त जमिनी सोडून इतर जमिनीत पाण्यात विद्राव्य असलेल्या स्फुरदयुक्त खते वापरावीत. उदा. सिंगल सुपर फॉस्फेट. माती तपासणी अहवालात सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळून आल्यास शिफारसीनुसार सूक्ष्म अन्नद्रव्याची मात्रा सुध्दा द्यावी कारण ही अन्नद्रव्ये सुध्दा मुख्य व दुय्यम अन्नद्रव्याइतकीच महत्त्वाची असतात.



# ठिबकद्वारे खते द्या थेट मुळांशी



ठिबक सिंचन पद्धतीत पाण्याद्वारे पाण्यात विरघळणारी (विद्राव्य) खते पिकाच्या मुळांशी योग्य त्या प्रमाणात व पाहिजे त्या वेळी (पिकांच्या गरजेनुसार) परिणामकारकरित्या देता येतात. पाण्याबरोबर खते व मूलद्रव्ये देण्याच्या या प्रकारास शास्त्रीय भाषेत फर्टिगेशन असे म्हणतात.

ठिबक सिंचनाद्वारे खते देताना प्रमाणबद्ध आणि मात्राबद्ध पद्धतीने देता येतात. प्रमाणबद्ध पद्धतीमध्ये खताची तीव्रता खत देण्याच्या संपूर्ण कालावधीमध्ये स्थिर राहते. खतमात्रा व पाण्याचा प्रवाह सतत एकसारखा राहतो. उदा. एक लिटर खत द्रावण आणि १०० लिटर पाणी या पद्धतीमध्ये खतमात्रा तीव्रतेच्या स्वरूपात म्हणजेच ‘‘पीपीएम’मध्ये मोजली जाते. मात्राबद्ध पद्धतीमध्ये खताची तीव्रता बदलत राहते. ठिबक सिंचनाद्वारे खत मिश्रित व खत विरहित पाणी पिकाच्या मुळांशी सतत दिले जाते. या पद्धतीमध्ये खतमात्रा कि. ग्रॅम/हेक्टर या स्वरूपात मोजली जाते.

फर्टिगेशनचे फायदे :खतांचा अधिक कार्यक्षमतेने वापर. द्रवरूप खत पिकांच्या मुळांद्वारे लवकर शोषली जातात. त्यामुळे खतांचा अपव्यय टळतो. त्यामुळे खतमात्रेत २५ ते ५० टकके बचत होते. तर पाण्यामध्ये ३० ते ५० टक्के बचत होते. खतांच्या उपलब्धतेत वाढ. पिकांच्या मुळांच्या जवळच खत आणि पाणी दिलं जातं. त्यामुळे खत आणि पाणी यांची वापरक्षमता वाढते.

मजुरीच्या खर्चात बचत :पिकांच्या वाढीच्या अवस्थेनुसार आणि गरजेनुसार आवश्यक त्या प्रमाणात खत देता येतात. दर्जेदार व अधिक उत्पन्न मिळते. पीक लवकर तयार होते. उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ होते.

जमीनीच आरोग्य अबाधित राखलं जाते :द्रवरूप खतातून पिकाला लागणारी सर्वच्या सर्व अन्नद्रव्य एकाच वेळी दिली जातात. हलक्या प्रतीच्या जमिनीत देखील पिकं घेता येतात. आम्लयुक्त विद्राव्य खतामुळे ठिबक संचामध्ये आपोआप रासायनिक स्वच्छता होते. पिकांच्या वाढीच्या अवस्थेनुसार आणि गरजेनुसार आवश्यक त्या प्रमाणात खत देता येतात. खतांची कार्यक्षमता ८० ते ९० टक्क्यांपर्यंत वाढविता येते. विद्राव्य खतांमध्ये सोडियम आणि क्लोरिनचे प्रमाण अतिशय कमी असते. सूक्ष्म द्रवरूप खतांची फवारणी पिकांवर त्वरित करता येते.

फर्टिगेशनसाठी खते निवडतांना घ्यावयाची काळजी :खते पाण्यामध्ये लवकरात लवकर विरघळणारी असावीत. खतांची विरघळण्याची क्षमता अधिक असावी. पाण्यात विरघळल्यानंतर त्यातील क्षारांचे अविद्राव्य स्वरुपात एकत्रीकरण होता कामा नये. खताच्या संचाच्या घटकांवर कोणताही परिणाम होणार नाही अशी खते निवडावीत. खते शेतातील वापरासाठी सुरक्षित असावीत. खतांची पाण्यात असणाऱ्या क्षारांबरोबर कोणत्याही प्रकारची रासायनिक अभिक्रिया होणार नाही याची काळजी घ्यावी. एकाच वेळी एकापेक्षा अधिक खते एकत्र द्यावयाची असल्यास त्यांची आपापसात कोणतीही रासायनिक अभिक्रिया होणार नाही अशीच खते एकत्रित द्यावीत. ठिबक संचातून युरिया, डायअमोनियम फॉस्फेट व म्युरेट ऑफ पोटॅश हि खते देता येतात

फर्टिगेशनसाठी उपकरणे :सूक्ष्म सिंचन संचातून पिकांना विद्राव्य खते देण्यासाठी प्रामुख्याने खताची टाकी / फर्टिलायझर टँक , व्हेन्चुरी इंजेक्शन पंप इत्यादी उपकरणे वापरली जातात. वर नमूद सर्व उपकरणांमध्ये सर्वाधिक वापरले जाणारे व फायदेशीर असे उपकरण आहे व्हेन्चुरी.

व्हेन्चुरी तंत्रज्ञान :व्हेन्चुरी ही डमरूच्या आकाराची मध्यभागी कमी होत जाणारी व्यासाची असल्यामुळे पाण्याचा वाहण्याचा वेग वाढतो व व्हेन्चुरीच्या मध्यभागी उपलब्ध दाब कमी होऊन हवेची पोकळी निर्माण होते (व्हॅकयूम). ह्यामुळे खताच्या टाकीमधील खताच्या द्रावणाचे शोषण होऊन पुढे मुख्य नळीमधून संचामध्ये आलेले खत उपनळ्यांमधून सिंचनाच्या वेळी ड्रीपर्समार्फत पिकांच्या मुळांजवळ दिले जाते. खत टाकीमधील पाण्यात मिसळावे व नंतर त्या टाकीत व्हेन्चुरी नलिकेतून निघालेली नळी सोडण्यात यावी.ठिबक सिंचन संच सुरु केल्यानंतर दोन्ही नियंत्रण झडपा सुरु केल्या कि मग टाकीतील खते व्हेन्चुरीतून शोषले/ ओढले जातात व ते संचाच्या पाईपमधील पाण्याच्या प्रवाहात मिसळून उपनलीकेवरील असलेल्या ड्रीपरमधून झाडांच्या / पिकांच्या मुळांच्या कक्षेत सोडले जातात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२९ : घाघरा येथील युद्धात मुघल सम्राट बाबर यांनी बंगाल आणि बिहारच्या शासकांचा पराभव केला.
१५३६ : इंग्लंडचे राजा हेनरी अष्टम यांनी प्रत्येक गीरीजाघरात बाईबल हे धार्मिक पुस्तक ठेवण्यास सांगितले.
१५४२ : सेंट फ्रान्सिस झेव्हिअर तत्कालीन पोर्तुगीज गोव्याची राजधानी ओल्ड गोवा येथे पोहोचला.
१६३२ : शहाजहान बादशहा व आदिलशहा यांच्यामधे शहाजीला पराभूत करण्याबद्दल तह झाला.
१८१८ : वैशाख शु. १ शके १७४० राजधानी रायगड लढवत असताना शेवटच्या बाजीरावाची पत्नी वाराणशीबाई इंग्रजांकडून पराभूत झाली.
१८३५ : अमेरिकन वर्तमानपत्र न्यूयॉर्क हेरॉल्ड चे प्रकाशण करण्यास सुरुवात झाली.
१८४० : एक पेनी किमतीचे ’पेनी ब्लॅक’ नावाचे जगातील पहिले टपाल तिकीट इंग्लंडमध्ये विक्रीसाठी खुले झाले. हे तिकीट १ मे १८४० रोजी जारी झाले होते.
१८८९ : पॅरिसमधील ’आयफेल टॉवर’चे उद्घाटन झाले.
१९१० : ब्रिटीश शासक एडवर्ड सप्तम यांच्या निधनानंतर त्यांची गाद्दी त्यांचे पुत्र जॉर्ज पंचम यांनी सांभाळली.
१९४४ : पुणे येथील आगा खान पॅलेस मधून महात्मा गांधी यांची सुटका झाली.
१९४९ : ईडीएसएसी पहिले इलेक्ट्रॉनिक डिजिटल संचयित संगणक सॉफ्टवेअर सुरु झाले.
१९५४ : रॉजर बॅनिस्टर हे १ मैल चार मिनिटांच्या आत धावणारे पाहिले व्यक्ती ठरले.
१९८३ : अडोल्फ हिटलर यांच्या डायरीचा लबाडी म्हणून खुलासा केला गेला.
१९९४ : इंग्लंडची राणी एलिझाबेथ (दुसरी) आणि फ्रान्सचे अध्यक्ष फ्रँकॉइस मित्राँ यांच्या हस्ते इंग्लिश खाडीखालुन जाणार्या आणि इंग्लंड व फ्रान्स यांना जोडणार्या ’युरो टनेल’चे उद्घाटन झाले.
१९९७ : ’बँक ऑफ इंग्लंड’ला स्वायत्तता देण्यात आली.
१९९९ : महाराष्ट्र राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांत महिलांना तीस टक्के आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला. अस निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.
२००१ : पोप जॉन पॉल (दुसरे) यांनी सिरीयातील एका मशिदीस भेट दिली. मशिदीस भेट देणारे ते पहिलेच पोप होत.
२००२ : भूपिंदर नाथ किरपाल यांनी भारताचे ३१ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२०१५ : सलमान खान यांना सदोष मनुष्यवधाच्या आरोपास दोषी ठरवून ५ वर्ष्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच सलमान खान यांची हायकोर्टात अपील दाखल करून, जामिनावर सुटका.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : सिग्मंड फ्रॉईड ऑस्ट्रियन मानसशास्त्रज्ञ, आधुनिक मानसशास्त्राचा जनक (मृत्यू: २३ सप्टेंबर १९३९)
१८६१ : मोतीलाल गंगाधर नेहरू भारतीय स्वातंत्र्यसेनानी, स्वराज्य पक्षाचे संस्थापक सदस्य, कायदेपंडित (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९३१)
१९२० : बुलो चंदीराम रामचंदानी ऊर्फ बुलो सी. रानी जुन्या पिढीतील संगीतकार व गायक (मृत्यू: २४ मे १९९३ मुंबई)
१९४० : प्रसिद्ध महिला तबलावादक, गायिका आणि संगीतज्ञ अबन मिस्त्री यांचा जन्म.
१९४३ : लेखिका वीणा चंद्रकांत गावाणकर यांचा जन्म.
१९५१ : लीला सॅमसन भरतनाट्यम नर्तिका, नृत्यदिग्दर्शिका आणि लेखिका. संगीत नाटक अकादमी आणि फिल्म सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षा
१९५३ : टोनी ब्लेअर ब्रिटनचे पंतप्रधान आणि मजूर पक्षाचे अध्यक्ष १९६४: अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय जलतरणपटू खजान सिंह यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५८९ : रामतनू पांडे ऊर्फ मोहमाद आट्टा खान तथा संगीतसम्राट तानसेन अकबराच्या दरबारातील एक नवरत्न (जन्म: १५०६)
१८६२ : हेन्री थोरो अमेरिकन लेखक व विचारवंत (जन्म: १२ जुलै १८१७)
१९२२ : छत्रपती शाहू महाराज सामाजिक सुधारणांचे कृतीशील पुरस्कर्ते, कला, नाटक, संगीत यांचे प्रोत्साहक (जन्म: २६ जून १८७४)
१९४६ : भुलाभाई देसाई स्वातंत्र्यसेनानी व कायदेपंडित, त्यांनी होमरुल चळवळीतील कार्यकर्ते, १९३१ मधे ’गांधी-आयर्विन’ कराराप्रमाणे त्यांनी बार्डोलीच्या शेतकर्यांची बाजू मांडली. १९३२ मध्ये कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल त्यांना एक वर्षाचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली होती. (जन्म: १३ आक्टोबर १८७७)
१९५२ : मारिया माँटेसरी इटालियन डॉक्टर व शिक्षणतज्ञ. पूर्वप्राथमिक शिक्षणाविषयीच्या त्यांच्या उपक्रमामुळे तशा शाळा ’माँटेसरी’ या नावाने ओळखल्या जातात. (जन्म: ३१ ऑगस्ट १८७०)
१९६६ : रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे भारतातील पहिले सिनिअर रँग्लर, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री, भारताचे ऑस्ट्रेलियातील उच्चायुक्त (जन्म: १६ फेब्रुवारी १८७६)
१९९५ : आचार्य गोविंदराव गोसावी प्रवचनकार, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, हैदराबाद मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक.
१९९९ : कृष्णाजी शंकर हिंगवे पुणे विद्यापीठातील जयकर ग्रंथालयाचे पहिले ग्रंथपाल व संस्थापक सदस्य.
२००१ : विख्यात मराठी कादंबरीकार, लेखिका मालतीबाई बेडेकर यांचे पुणे येथे निधन.
२००६ : जगातील सर्वात मोठे प्रवासी जहाज टायटनिक च्या दुर्घटनेचे साक्षीदार अमेरिकन नागरिक लिलियन एस्प्लंट यांचे निधन.

# बीड जिल्ह्यात फायनान्स कंपन्यांची सावकारी फोफावली-दत्ता वाकसे

## आरबीआयचे नियम वेशीवर टांगून अव्वाच्या सव्वा कर्ज वसुली

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात फायनान्स कंपन्या व स्मॉल बँकांचे जाळे चांगलेच पसरले आहेत. महिलांना हाताशी धरून कर्ज वाटप केले जात आहे. कसलेही कागदपत्र न घेता सोयीस्कर कर्ज मिळत असल्यामुळे महिला देखील फायनान्स कंपन्यांच्या आहारी पडत आहेत. परिणामी बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जवळपास ७० टक्के कुटुंब फायनान्स कंपन्यांच्या सावकारीला बळी पडले आहेत. विशेष म्हणजे आरबीआयचे नियम झुगारून कर्जदार तथा सर्वसामान्यांकडून अव्वाच्या सव्वा कर्ज वसुली केली जात आहे. कर्जाच्या आहारी पडलेल्या महिला व त्यांचे कुटुंबांनी दाद कुणाकडे मागावी, असा सवाल मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी उपस्थित केला आहे. बीड जिल्ह्यात अनेक फायनान्स कंपन्यांनी आपले जाळे पसरविले आहे. फायनान्स कंपनीचे एजेंट पहाटे ५ वाजेपासूनच गावो-गावी पोहचून महिलांना कर्जाच्या जाळ्यात अडकवित आहेत. अत्यंत कमी कागदपत्रात कर्ज वाटप केले जाते. त्यामुळे प्रत्येक कुटुंबातील महिलाही फायनान्स



कंपनीच्या आहारी पडत आहेत. . बीड जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रातील ७० टक्के कुटुंब फायनान्स कंपन्याच्या जाळ्यात अडकल्याचे दिसून आले आहे. शासनाने विविध प्रकारचे नियम केले असले तरी खाजगी फायनान्स कंपन्यांचा मनमानी कारभार थांबाता थांबेना असे दिसून येत आहे. कपन्यांकडून अवाजवी व्याज व विविध प्रकारचा खर्च आकारून कर्जदारवर सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले जात आहे. फायनान्स कंपन्यांकडून कर्ज वाटप करणारे व वसूली करणारे प्रतिनिधी शेकडोच्या संख्येत जिल्ह्यात पहावयास मिळत आहे. अलीकडे रोजगार मिळत असल्यामुळे बेरोजगार युवक-युवतीही फायनान्स कंपन्याच्या जाळ्यात अडकत आहेत. कर्ज वसुली व अव्याजवी व्याज दरामुळे कर्जदार तथा त्यांचे कुटुंब चांगले हैराण झाल्याचे दिसून येत आहे. नेमका ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेने न्याय कुणाकडे मागावा, असा प्रश्नही मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी उपस्थित केला आहे. शासन प्रशासन जिल्हाधिकारी लक्ष घालतील काय? हा प्रश्न ग्रामीण भागातील जनतेच्या मनामध्ये आहे असा सवालही वाकसे यांनी केला आहे

### आरबीआयच्या नियमांना ठेंगा..

रिजव्ह बँकेने खाजगी बँकांना नियमावली ठरवून दिली आहे. तरीही खाजगी फायनान्स कंपन्या आपल्या मनमर्जीने व्याज आकारणी करीत आहेत. व्याजावर व्याज लावण्याचा धडाका देखील सुरू आहे. किती व्याज आकारले जात आहे, हे कर्जदारांना अगोदरच सांगणे हे आवश्यक असते. मात्र कर्ज दिल्यानंतर अनेक कंपन्या नवीन नियम लावून कर्जाचा बोजा सातत्याने वाढवत असतात. रिजव्ह बँकेने निर्बंध घातले असले तरी त्या निबंधला सर्रासपणे खाजगी फायनान्स कंपन्या ठेंगा दाखवित आहेत.

**काय आहे नियम ?:** महाराष्ट्र सावकारी अधनियम २०१४ हा कायदा २०१४ रोजी अस्तित्वात आला. कायद्यानुसार व्याज आकारणीत कलम ३१ (३) नुसार दामदुप्पटीचे नियम सावकारी स्तरावर लागू आहे. त्याच बरोबर स्थावर मालमत्ता संशयीतरित्या सावकाराकडे आढळून आल्यास कलम १८ नुसार जप्त करण्याची तरदूत आहे. चक्रव्याज आकारणी मनाई आहे. मात्र कायद्याची कडक अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत आहे.

## बीड शहर पोलिसांचा गुटख्याच्या अड्ड्यावर छापा; साडेचार लाखाचा मुद्देमाल जप्त



बीड । प्रतिनिधी

शहर पोलिसांना खात्रीशीर माहिती मिळाली होती की शहरात काही ठिकाणी गुटखा साठा करून ठेवला आहे, आणि लवकरच तो माल पानटपरी, आणि किराणा दुकानदार वरून वितरित होणार आहे... यावरून पोलिसांनी पथक तयार करून छापा मारला असता, एकूण साडेचार लाखाचा मुद्देमाल मिळून आला आहे, यात मोमीन मोहम्मद तक्युदिन पिता फजिउद्दीन राहणार हत्तीखाना, बीड यास अटक करण्यात आली असून यातील आरोपी वाजेद हा फरार आहे. तसेच यामध्ये एक अल्पवयीन मुलगा सुद्धा ताब्यात घेण्यात आला होता. यामध्ये आणखी आरोपी निष्पन्न होणार असून हा माल कोठे कोठे पाठवला गेला होता, कोण कोणत्या पान टपरीवर हा सप्लाय केला जात होता, याचा तपास करुन निष्पन्न झालेल्यांना आरोपी करुन यामध्ये पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहेत. यातील अटक आरोपीला तीन दिवसांची पीसीआर मिळाली आहे. पोलिस अधीक्षक श्री नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी विश्वंभर गोल्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पी आय शितलकुमार बल्लाळ पोस्ट बीड शहर व एपीआय बाबा राठोड तसेच पीएसआय संदीप नेवरे साहेब यांच्या डी बी टीमने जयसिंग वायकर, अश्फाक सय्यद, सुशेन पवार, मनोज परजने, सचिन अलगट , गोवर्धन सोनवणे, तांबरे, अयोध्या डोके , शहाबाई कांबळे, शौकत यांनी ही कारवाई केली.

## खोलेश्वर महाविद्यालयाची वर्षांत बैठक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कनिष्ठ, वरिष्ठ व किमान कौशल्य विभागाची वर्षांत बैठक महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रामभाऊ कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीमध्ये प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक फुलारी, उपप्राचार्य प्रा. गौतम गायकवाड, उपप्राचार्य डॉ. बिभिषण फड उपप्राचार्य डॉ. रवींद्र कुंबेफळकर, पर्यवेक्षक प्रा. जिजाराम कावळे व व्यवसाय शिक्षण विभागाचे पर्यवेक्षक प्रा. योगेश कुलकर्णी हे उपस्थित होते.

बैठकीचे प्रस्ताविक प्राचार्य डॉ. दीपक फुलारी यांनी केले. त्यामध्ये बैठकीची रुपरेषा, संकल्पना व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त महाविद्यालयात घेण्यात आलेल्या उपक्रमांच्या अनुषंगाने आढावा घेतला. त्याचबरोबर विद्यासभेच्या रचनेप्रमाणे अभ्यासेत्तर , अभ्यासपूरक व अध्ययन- अध्यापन उपक्रम कार्याचा उहापोह केला. महाविद्यालयाची शिस्त, गुणवत्ता व लौकिक वाढवण्यासाठी सर्वांनी पुढे परिश्रम घ्यावे अशी अपेक्षा त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली .विभागनिहाय अहवाल वाचन करत असताना कनिष्ठ विभागाचा




अहवाल पर्यवेक्षक प्रा. जिजाराम कावळे यांनी सादर केला. किमान कौशल्य व व्यवसाय अभ्यासक्रम विभागाचा अहवाल उपप्राचार्य डॉ. रवींद्र कुंबेफळकर यांनी सादर केला. त्याचप्रमाणे वरिष्ठ विभागाचा अहवाल उपप्राचार्य प्रा. गौतम गायकवाड यांनी सादर केला. आय.क्यू.ए.सी विभागाचा अहवाल समन्वयक डॉ. सुभाष पटेकर, परीक्षा विभागाचा अहवाल प्रा.तुळशीराम मुंढे यांनी तर कार्यालयीन कामकाजाचा अहवाल अधीक्षक उत्तरेश्वर आनेवार यांनी सादर केला.अध्यक्षीय समारोप करत असताना महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष रामभाऊ कुलकर्णी यांनी वर्षातील घेतलेले उपक्रम, तपासणी, दर्जेदार अध्ययन गुणवत्ता, महाविद्यालयीन शिस्त याबद्दल प्राध्यापक व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. चांगल्या कार्याची प्रशंसा केली. शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ साठी प्रवेशासाठी नियोजना बद्दल सूचना दिल्या व यापुढेही प्राध्यापक, कर्मचारी यांनी महाविद्यालयाच्या लौकिकात वाढ होईल यासाठी परिश्रम घ्यावे असी अपेक्षा व्यक्त केली . बैठकीचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. बिभिषण फड यांनी केले तर आभार पर्यवेक्षक प्रा. योगेश कुलकर्णी यांनी मानले. या बैठकीला प्राध्यापक बंधू-भगिनी व कर्मचारी उपस्थित होते.

## समाजातील गरजूंना मदत होईल असे कार्य करून जन्मोत्सव साजरा करणे ही काळाची गरज-जगदीश पिंगळे

### पेशवा प्रतिष्ठान तर्फे विविध कार्यक्रमाने भगवान परशुराम जन्मोत्सव साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील पेशवा प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी भगवान श्री परशुराम जन्मोत्सव निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार जगदीश पिंगळे म्हणाले की, समाजातील गरजूंना मदत होईल असे कार्य करून जन्मोत्सव साजरा करणे ही काळाची गरज आहे. विविध संघटना वेगवेगळे उपक्रम राबवितात परंतु पेशवा प्रतिष्ठान यांनी राबविलेले उपक्रम हे नेहमीच समाजपयोगी असतात.

यावेळी व्यासपीठावर गणपतराव व्यास, रामभाऊ कुलकर्णी, सौ रोहिणी पाठक यांची उपस्थिती होती.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना व्यास गुरुजी म्हणाले की , तरुणांनी उद्योगाकडे वळावे,हि काळाची गरज असून सध्या सगळ्यांना नोकरी मिळणे शक्य नाही व व्यवसायात तरुणांना यश मिळण्यासाठी चिकाटी व प्रयत्न महत्वाचे आहेत. रामभाऊ कुलकर्णी ,रोहिणी पाठक , राहुल कुलकर्णी, प्रशांत बर्दापूरकर यांनीही मनोगत व्यक्त केले. भगवान श्री परशुराम यांचे पूजन करून



कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यानंतर परशुराम विद्यार्थी सहाय्यक मंडळा तर्फे पवन कुलकर्णी या एम बी बी एस ला शिकणाऱ्या विद्यार्थ्यास बिनव्याजी ५० हजार रू शैक्षणिक मदत देण्यात आली. मदतीचे हे चौथे वर्ष आहे.तसेच नवनाथ जोशी यांच्या नृसिंह वेदशाळेला रू पाच हजारांची मदत करण्यात आली. या प्रसंगी योगेश्वरी वधू वर परिचय पुस्तिकेचे प्रकाशन व समाज भूषण पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी प्रशांत बर्दापूरकर, डॉ कौस्तुभ कुलकर्णी, स्मिता भातलवंडे यांना समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रा मुकुंद जोशी यांना पीएचडी मिळाल्याबद्दल तर सौ स्मिता धावडकर यांची उप मुख्याध्यकापदी पदोन्नती झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ महेश अकोलकर यांनी केले. सूत्र संचालन डॉ संकेत तोरंबेकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रणिता पोखरीकर यांनी केले. मान्यवरांचे स्वागत श्रीकांत जोशी, केदार दामोशन , ऍड वैजनाथ वांजरखेडे, पार्थ कुलकर्णी, गौरव कुलकर्णी, अक्षय देशमुख,अनिता औटी, रोहिणी जड, अपर्णा भालेराव, साधना विर्धे यांनी केले.कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात ब्रह्मवृंदाची उपस्थिती होती.. कार्यक्रम यशस्वितेसाठी पेशवा प्रतिष्ठानचे पदाधिकारी यांनी पुढाकार घेतला. यावेळी ब्रह्मवृंदाची लक्षणीय उपस्थिती होती.

## थोडक्यात

### मुख्य शासकीय ध्वजारोहण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते

बीड : बीड येथील महाराष्ट दिनाचा मुख्य शासकीय सोहळा गुरुवार दि. १ मे रोजी राज्याचे राज्यमंत्री उद्योग,सार्वजनिक बांधकाम इंद्रनील नाईक यांच्या हस्ते होणार आहे. मुख्य ध्वजारोहण सोहळा जिल्हा पोलीस मुख्यालय कवायत मैदान येथे सकाळी ८.०० वाजता होणार आहे. या समारंभास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### नूतन इमारत न्या. नितीन सूर्यवंशी यांच्या हस्ते आज कोनशिला समारंभ

बीड : परळी वैद्यनाथ येथे बांधण्यात येणा-या दिवाणी आणि फौजदारी न्यायालय नूतन इमारतीचा कोनशिला समारंभ उद्या गुरुवार दि. १ मे २०२५ रोजी, महाराष्ट्र दिनी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन भगवंतराव सूर्यवंशी यांच्या हस्ते सकाळी ११.०० वाजता होणार आहे. या कार्यक्रमास राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती रविंद्र मधुसूदन जोशी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद लक्ष्मीकांत यावलकर हे असतील. या कोनशिला समारंभास उपस्थित रहावे असे आवाहन परळी वकील संघाचे अध्यक्ष ॲड हरिभाऊ गुटटे आणि दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) तथा न्यायदंडाधिकारी दीपक बोर्डे यांनी केले आहे.

## पोलीस पाटील भरतीला स्थगिती देऊन नव्याने आरक्षण जाहीर करावे-महादेव नागरगोजे पाटील

शिरूर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात ९४५ पोलीस पाटलांच्या रिक्त पदांची भरती प्रक्रिया प्रशासनाने हाती घेतली आहे. या प्रक्रियेसाठी गेल्या दोन-तीन वर्षांपूर्वी आरक्षण सोडत करण्यात आली होती. मात्र ही आरक्षण सोडत अगदी चुकीच्या आणि बेकायदेशीरपणे झाली असल्याचे मागील निवेदनाच्या माध्यमातून आपणास निदर्शनास आणून देण्यातही आलेले आहे. या सोडतीच्या आधारावर होऊ घातलेल्या पोलीस पाटील भरती प्रक्रियेला पूर्णपणे स्थगिती देण्यात यावी अशी पुनश्च एकदा महादेव नागरगोजे पाटील यांनी केली असून,जिल्हाधिकारी साहेबांनी जिल्ह्यातील पोलीस पाटील रिक्त पदांच्या भरतीसाठी पारदर्शकता यावी यासाठी नव्याने आरक्षण सोडत घेऊन भरती प्रक्रिया राबवावी असेही नागरगोजे पाटील यांनी म्हटले आहे.



बीड जिल्ह्यामध्ये होऊ घातलेल्या पोलीस पाटील भरती अनुषंगाने बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने सुमारे दोन वर्षांपूर्वी दि. २० नोव्हेंबर २०२३ रोजी पोलीस पाटील रिक्त पदांच्या आरक्षण सोडती बाबत नोटीस जाहीर करण्यात आली होती. याप्रमाणे तहसील कार्यालय बीड येथे दिनांक ७ डिसेंबर २०२३ रोजी आरक्षण सोडती संदर्भात बैठक घेण्यात आली होती. सदरील बैठकीमध्ये गावातील जातनिहाय, प्रवर्गनिहाय, बिंदू नामावलीचा रिक्त पदांचा प्रवर्गनिहाय व सन २०११ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार गावातील लोकसंख्येची आकडेवारी जाहीर करून जास्तीची लोकसंख्या असलेल्या प्रवर्गास आरक्षण देण्यास प्राधान्य देण्यात यावे असे निर्देशित करण्यात आले होते. मात्र गेवराई,शिरूर, बीड तालुक्यातील अनेक गावांमध्ये आरक्षण सोडत देताना वरील आदेशाचे पालन करण्यात आले नाही. यामुळे अनेक गावांमधून पोलीस पाटील भरती आरक्षण सोडतीबाबत अर्जाच्या माध्यमातून अक्षप ही नोंदवण्यात आलेला आहे. असे असतानाही जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून पोलीस पाटलांच्या रिक्त पदांची याच आरक्षण सोडतीवर भरती प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे समोर आले आहे. या कामी नूतन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेबांनी लक्ष घालून तूर्तासही पोलीस पाटील भरतीला स्थगिती द्यावी. आणि गाव पातळीवरती अधिकारी-कर्मचाऱ्यांना पाठवून गावागावातून पारदर्शक सर्वे करून नव्याने आरक्षण सोडत जाहीर करावी व नंतरच रिक्त पोलीस पाटलांची भरती करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र पोलीस पाटील असोसिएशनचे राज्याध्यक्ष तथा तिंतरवणी गावचे पोलीस पाटील महादेव नागरगोजे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास पुनश्च एकदा नव्याने निवेदन देऊन मागणी केली आहे.

### गावागावातील हरकतीचा विचार व्हावा

पोलीस पाटील रिक्त पदांच्या भरतीसाठी सन २०२३ मध्ये जाहीर केलेली आरक्षण सोडत ही अगदी चुकीची आणि बेकायदेशीर पण राबवले असल्याचे जिल्ह्यातील अनेक गावातून हरकती नोंदवण्यात आलेले आहेत. गावागावातून हरकती देऊन जिल्हा प्रशासनाच्या वतीने याच आरक्षण सोडतीवर भरती प्रक्रिया राबवण्याचा का घाट मांडला जात आहे असा प्रश्न जनतेतून उपस्थित होत आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने तिचा विचार करून नव्याने आरक्षण सोडत जाहीर होईल का? असा प्रश्न या निमित्ताने जनतेला पडत आहे.

## राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या महाराष्ट्र गौरव रथयात्रेचे बीडमध्ये उत्साहात स्वागत

बीड। प्रतिनिधी

संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ६५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या संकल्पनेतून आयोजित गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव २०२५ अंतर्गत निघालेल्या गडकिल्ले, माती आणि नद्यांचे जल-कुंभ रथयात्रेचे बुधवारी (दि.३०) दुपारी १ वाजता बीडमध्ये जल्लोषात स्वागत करण्यात आले.

या गौरव रथयात्रेच्या माध्यमातून राज्याच्या निर्मितीत मोलाचे योगदान देणाऱ्या थोर महापुरुषांचा परिचय नव्या पिढीसमोर मांडला जात असून, महाराष्ट्राच्या इतिहासाला उजाळा देण्याचा हेतू ठेवण्यात आला आहे. ही रथयात्रा संपूर्ण राज्यभर फिरणार आहे. बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे ही यात्रा पोहोचल्यावर विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात स्वागत झाले. स्वागत समारंभावेळी प्रमुख समन्वयक आमदार विक्रम काळे, राष्ट्रवादी सेवादलाचे राज्य कार्याध्यक्ष शिवाजी बनकर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर चव्हाण, तसेच बळीराम गवते, शेख तय्यब, शेख निजाम, हारून इनामदार, फारूक पटेल, नगराध्यक्ष सीता बनसोड, बाजीराव धर्माधिकारी, प्रा. ईश्वर मुंडे, रेखा फड, ॲड. प्रज्ञा खोसरे, दीपक घुमरे, प्रिया डोईफोडे यांच्यासह राज्य व जिल्हा पातळीवरील अनेक आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी अनेक पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर ही महाराष्ट्र गौरव रथयात्रा गेवराईच्या दिशेने पुढे मार्गस्थ झाली.

# जय जवान विद्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी

वडवणीबीड। प्रतिनिधी

आज रोजी दि.३०/०४/२०२५ वार बुधवार वडवणी तालुक्यातील मौजे कवडगाव (बु.)येथील जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव या विद्यालयात थोर महान आपल्या खंजिरी भजनातून सामाजिक नैतिक शिकवण देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती व महात्मा बसवेश्वर यांची जयंती विद्यालयात साजरी करण्यात आली. सदरील कार्यक्रमासाठी संस्थेचे मा.अध्यक्ष, सचिव,पदाधिकारी, मा. सरपंच,उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य व पदाधिकारी, शालेय व्यवस्थापन समिती मा. अध्यक्ष सदस्य तसेच गावातील सर्व मान्यवर,ग्रामस्थ,शिक्षणप्रेमी, जेष्ठ नागरिक, पालक वृंद, माजी विद्यार्थी मंडळ व विद्यालयातील सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद आदी सर्व उपस्थित होते.सदरील कार्यक्रम सुरवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व महात्मा बसवेश्वर यांच्या पावन प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुष्प व



पुष्प माला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य श्री. सारोक्ते डि.जी सर हे होते. तर उपस्थित मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी यांच्या विषय विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली विचार प्रकट करत.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्राम गीतेतून,खंजिरी भजनातून,किर्तनातून मोलाचे असे संदेश दिले. भारत हा खेड्यांचा देश आहे, हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्राचा विकास होईल, अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती. समाजातल्या सर्व घटकांतील लोकांचा उद्धार कसा होईल, याविषयी त्यांनी अहर्निश चिंता केली. ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच होता. भारतातील खेड्यांच्या स्थितीची त्यांना पुरेपूर कल्पना होती. त्यामुळे त्यांनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मूलभूतस्वरूपी विचार केला व त्या समस्या कशा सोडवाव्यात, याविषयी उपाययोजनाही सुचविली. या उपाययोजना त्यांच्या काळाला तर उपकारक ठरल्याच पण त्यानंतरच्या काळालाही उचित ठरल्या. हे आज (त्यांनी आपली जीवनयात्रा संपल्यानंतरच्या काळातही) तीव्रतेने जाणवते. अशा गोष्टींतूनच राष्ट्रसंतांचे द्रष्टेपण दिसून येते.

अमरावतीजवळ मोझरीच्या गुरुकुंज आश्रमाची स्थापना हे तुकडोजींच्या आयुष्यातील जसे लक्षणीय कार्य आहे, त्याचप्रमाणे ग्रामगीतेचे लेखन हाही त्यांच्या जीवनकार्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. ग्रामगीता ही जणू तुकडोजी महाराजांच्या वाङ्मयसेवेची पूर्तीच होय. स्वतःला ते तुकड्यादास म्हणत कारण भजन म्हणताना ते जी भिक्षा घेत, त्यावरच आपण बालपणी जीवन कंठिले, ह्याची त्यांना जाणीव होती.खेडेगाव स्वयंपूर्ण कसे होईल, याविषयीची जी उपाययोजना तुकडोजी महाराजांनी सुचविली होती, ती अतिशय परिणामकारक ठरली. ग्राम हे सुशिक्षित व्हावे, सुसंस्कृत व्हावे, ग्रामोद्योग संपन्न व्हावेत, गावानेच देशाच्या गरजा भागवाव्यात, ग्रामोद्योगांना प्रोत्साहन मिळ्ाो, प्रचारकांच्या रूपाने गावाला नेतृत्व मिळावे, असा त्यांचा प्रयत्न होता. त्याचे प्रतिबिंब ग्रामगीतेत उमटले आहे. देवभोळेपणा, जुनाट कालबाह्य अंधश्रद्धा नाहीशा व्हाव्यात, याविषयी त्यांनी अविरत प्रयत्न केले.सर्वधर्मसमभाव हेही या राष्ट्रसंताच्या विचारविश्वाचे एक वैशिष्ट्य होते. त्यासाठी तुकडोजी महाराजांनी सामुदायिक/सर्वधर्मीय प्रार्थनेचा आग्रहपूर्वक पुरस्कार केला.तुकडोजी महाराज हे विवेकनिष्ठ जीवनदृष्टीतून एकेश्वरवादाचा पुरस्कार करत असत. धर्मातील अनावश्यक कर्मकांडाला त्यांनी फाटा दिला होता. आयुष्याच्या शेवटापर्यंत त्यांनी आपल्या प्रभावी खंजिरी भजनाच्या माध्यमातून त्यांना अभिप्रेत असलेल्या विचारसरणीचा प्रचार करून आध्यात्मिक, सामाजिक, राष्ट्रीय प्रबोधन केले. स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना कारावासही भोगावा लागला. अखिल भारतीय पातळीवर त्यांनी साधुसंघटनेची स्थापना केली. गुरुकुंज आश्रमाच्या शाखोपशाखा स्थापन करून त्यांनी शिस्तबद्ध सामाजिक कार्यकर्त्यांची एक फळीच निर्माण केली. गुरुकुंजाशी संबंधित असलेले हे सर्व निष्ठावंत कार्यकर्ते आजही त्यांचे हे कार्य अखंडव्रतासारखे चालवीत आहेत.महिलोन्नती हाही तुकडोजी महाराजांच्या विचारविश्वाचा एक लक्षणीय पैलू होता. कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, राष्ट्रव्यवस्था ही स्त्रीवर कशी अवलंबून असते, हे त्यांनी आपल्या कीर्तनांद्वारे समाजाला पटवून दिले. त्यामुळे स्त्रीला अज्ञानात व दास्यात ठेवणे कसे अन्यायकारक आहे, हे त्यांनी अत्यंत प्रभावीपणे पटवून दिले.देशातले तरुण हे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ. ते बलोपासक असावेत म्हणजे ते समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करू शकतील. ते नीतिमान व सुसंस्कृतयुक्त कसे होतील, याविषयीचे उपदेशपर व मार्गदर्शनपर लेखन तुकडोजींनी केले. या राष्ट्रसंताने आपल्या लेखनातून व्यसनाधीनतेचा तीव्र निषेध केला.

राज्य लोकतंत्र

गुरूवार, दि.१ मे २०२५



# गाळ माफियांच्या आशिर्वादाने धुनकवाड येथे कुंडलीका धरणातून अवैध गाळ उपसा सुरू

## शेतकऱ्यांना गाळ देण्या ऐवजी विटभट्टीधारकाना विकला जातोय गाळ; जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या समोर गाळ माफियांचे आव्हान

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील धुनकवाड येथील कुंडलीका धरणातुन अवैध गाळ उपसा सुरू असुन हा गाळ शेतात जात नसुन विटभट्टी धारकांना विकला जात असुन गाळ माफियांचा नंगानाच चालु आहे तरी हा गाळ शेतकऱ्यांना शेतात टाकण्यासाठी खुला करुन देऊन शेतकऱ्यांना न्याय द्यावा व अवैध गाळ उपसा करणा-यांवर कारवाई करावी अशी मागणी शेतकऱ्यांतुन होत आहे. धुनकवाड येथील कुंडलीक धरणातुन अवैध गाळ उपसा रात्रं-दिवस चालू आहे भुसंपादीत झालेल्या जमिनीत शासनाला कुठलीही रॉयल्टी भरत नाहीत व विटभट्टीला अवैध गाळ विकुन गाळ माफिया लाखो रुपये कमवत आहेत.तरी हा गाळ शेतकऱ्यांचा शेतात टाकण्यासाठी प्रशासनाने काही तरी उपाययोजना कराव्यात.

बीड जिल्ह्यात वाळू माफिया,भू-माफिया, राख माफिया यानंतर आता गाळ माफिया निर्माण झाले असून त्या गाळ माफीया यांना आवर घालण्याचे आवाहन



### गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेचे वाजले तीन तेरा

धरणांमध्ये दरवर्षी साठत चाललेल्या गाळामुळे धरणांच्या साठवण क्षमतेत मोठया प्रमाणात घट होत आहे. धरणांमध्ये साचलेला गाळ उपसा करुन शेतात पसरविल्यास धरणांची मुळ साठवण क्षमता पुर्न:स्थापित होण्याबरोबरच शेतकऱ्यांना कृषि उत्पन्नात वाढ होईल म्हणून मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने शेतकर्यांसाठी संजीवनी ठरलेली ''गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार'' ही योजना विटभट्टीधारकांच्या घशात घातली असून शेतकरी या योजनेपासून वंचित राहत असल्याने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेचे तीन तेरा वाजले आहेत.

### नवनिर्वाचित जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लक्ष देण्याची गरज

**धारुर तालुक्यातील धुनकवाड येथील कुंडलीका धरणातुन अवैध गाळ उपसा सुरू असुन गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना शेतात गाळ टाकण्यासाठी ही योजना आहे परंतु हा गाळ विटभट्टी धारकांना विकला जात असल्याने शेतकऱ्यांना हा गाळ उपलब्ध होत नाही म्हणून शेतकरी या योजनेपासून वंचित राहत आहेत तरी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लक्ष देऊन हा गाळ शेतात टाकण्यासाठी शेतकऱ्यांना खुला करुन देण्यात यावा अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.**

### गाळ माफिया माला-माल शेतकरी कंगाल

### तालुक प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष

नवनिर्वाचित जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासमोर आहे.

धुनकवाड येथे कुंडलीका धरण असुन या धरणामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी या धरणात गेल्या त्याचा मावेजा ही शासनाने त्या शेतकऱ्याला दिला परंतु ह्या गाळपेरा म्हणून हे शेतकरी पिक घेऊ लागले व आता तर या गाळपेराच्या नावाखाली येथील शेतकरी विटभट्टीधारकांना गाळ विकु लागले असल्याने प्रशासनाच्या जमिनीचा मावेजा घेऊन ही शासनाच्या जमिनीवर हे शेतकरी लाखो रुपयांचा गाळ विकु लागले.

राज्य शासनाने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना राबवली असुन या योजनेचे प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे तीन तेरा वाजले असुन ही योजना गाळ माफियाने विटभट्टी धारकांच्या घशात घातली असल्याने शेतकरी या योजनेपासून वंचित राहू लागला आहे याकडे तालुका प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे.

महाराष्ट्र राज्य हे देशात सर्वात जास्त धरणे, जलसाठे असलेले राज्य असून या धरणांमध्ये दरवर्षी साठत चाललेल्या गाळामुळे धरणांच्या साठवण क्षमतेत मोठया प्रमाणात घट होत आहे. या धरणांमध्ये साचलेला गाळ उपसा करुन शेतात पसरविल्यास धरणांची मुळ साठवण क्षमता पुर्न:स्थापित होण्याबरोबरच कृषि उत्पन्नात भरीव वाढ देखील होणार आहे. सदर बाब विचारात घेऊन शासनाने राज्यातील धरणामधील गाळ काढणे व तो शेतामध्ये वापरणे यासाठी "गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार" हि योजना राबविण्यास शासनाने मान्यता देण्यात आलेली आहे परंतु गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेचे तीन तेरा वाजल्याचे दिसत आहे.शेतकऱ्यांना शेतात टाकण्यासाठी गाळ देण्या ऐवजी विटभट्टीधारकाना विकला जातोय यामुळे गाळ माफिया माला-माल तर शेतकरी कंगाल होत चालला आहे तरी याकडे तालुका प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे तरी बीड जिल्ह्याच्या कर्तव्यदक्ष नवनिर्वाचित जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लक्ष देऊन हा गाळ शेतकऱ्यांना शेतात टाकण्यासाठी खुला करुन देण्यात यावा व गाळ माफियांच्या घशात गेलेला हा गाळ शेतकऱ्यांना शेतात टाकण्यासाठी देण्यात यावा व शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांतुन होत आहे.

# प्राथमिक पदवीधर शिक्षकांचे उपोषण तात्पुरते स्थगित

## युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागरांची मध्यस्थी; ना.अजितदादांसमोर प्रश्न मांडण्याची ग्वाही

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक पदवीधर, भाषा व सामाजिक शास्त्र विषयाच्या ७४ शिक्षकांनी गणित व विज्ञान विषयांत रूपांतर करण्याच्या मागणीसह इतर विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू होते. उपोषणस्थळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२९) भेट देत शिक्षकांशी संवाद साधला.



त्यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळे उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले की, शिक्षकांच्या मागण्या न्याय्य असून त्या शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या जातील. उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यामार्फत शासनदरबारी पाठपुरावा करून या मागण्यांची योग्य ती दखल घेण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून शिक्षकांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्यावर लवकरात लवकर तोडगा काढण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीला प्रतिसाद देत, मुख्य कार्यकारी ◀◀ पान ३ वर

# उसाचे थकीत बिले तात्काळ द्या अन्यथा कारखान्यांना टाळे ठोकण्याचा शेकापचा इशारा

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील अनेक साखर कारखान्यांनी गेल्या चार महिन्यापुर्वी गाळप केलेल्या ऊसाचे तीन महिन्यापासून बिले दिलेली नाहीत,वास्तविक दिवसात बिले देण्याचा कायदा असताना, कायदा वेशीला टांगून जाणीवपूर्वक शेतकऱ्यांना वेठीस धरल्यामुळे शेतकरी प्रचंड संकटात सापडलेले असून शासनाने याबाबत कुठलीही दखल घेतलेली नाही,या उलट



कारखानदारांना पाठीशी घालण्याचे पाप शासन करत आहे, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार गंभीर नसल्याने शेतकरी आत्महत्याचा आकडा हजारोवर पोहचला असताना भ्रष्ट आणि लबाड कारखानदारांना अभय दिले जात आहे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या कुटुंबाची अवस्था दयनीय झाली असून जगाचा पोशिंदा आपल्या कुटुंबाचे पोषण करण्यास असमर्थ ठरत आहे,व अनेक शेतकऱ्यांच्या मुलींची लग्न पैशा अभावी खोळंबून पडलेलीआहेत तर अनेक शेतकऱ्यांच्या दारात सावकार ठाण मांडून बसलेला आहे अशा विदारक परिस्थितीत शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर असून तात्काळ शेतकऱ्यांना हक्काचे, कष्टाचे पैसे द्यावेत ◀◀ पान ३ वर

# युसूफवडगाव येथे महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे जगतज्योती क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती साजरी करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

जगतज्योती क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांना अभिवादन करण्यासाठी महात्मा बसवेश्वर चौकामध्ये अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या पुतळयास



पीएसआय चनशेट्टी,रूपेश मुकदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.यावेळी उपस्थित वैद्यकीय अधिकारी डॉ.गुंडाप्पा थळकरी व डॉ.महादेव कोरसळे यांनी त्यांनी १२ शतकात घवडवलेल्या सामाजिक क्रांतीवर व जिवनकार्यवर प्रकाश टाकला यावेळी उपसरपंच महेश लामतुरे,पं.स.सदस्य उमाकांत भुसारी,अशोक मोडवे,सचिन जावळे,मन्मथ पाटील,अँड हनुमंत जाधव, ◀◀ पान ३ वर

# पर्यावरण व वातावरणीय बदल,पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा

बीड । प्रतिनिधी

पर्यावरण व वातावरणीय बदल,पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.



गुरुवार दि. १ मे २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता जालना येथून वाहनाने परळी वैद्यनाथ जि. बीडकडे प्रयाण सकाळी ११.०० वाजता बीड येथे आगमन व परळी वैद्यनाथ येथील दिवाणी व फौजदारी न्यायलयाचे नुतन इमारतीच्या कोनशिला समारंभास उपस्थिती. दुपारी १.०० ते ३.०० वाजेपर्यंत यशश्री निवासस्थान परळी येथे अभ्यांगतांच्या भेटी व संवाद.दुपारी ४.०० वाजता भारतीय जनता पार्टीच्या बीड जिल्हयातील नवनिर्वाचित मंडळ अध्यक्षांशी संवाद व सत्कार. सायंकाळी ५.३०. वाजता परळी वैद्यनाथ येथून वाहनाने अंबाजोगाईकडे प्रयाण.सायंकाळी ६.०० ◀◀ पान ३ वर



**परळी : विधानपरिषद सदस्य आमदार तथा शिवसेनेचे उपनेते मा.सचिनजी अहिर हे आज परळी - अंबाजोगाई दौऱ्यावर आले असता त्यांचा स्वागतसत्कार शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केला. यावेळी प्रभु वैजिनाथला अभिषेक करून पुजा करण्यात आली. उपस्थित शिवसैनिकांशी संवाद साधला यावेळीउपजिल्हाप्रमुख नारायण दादा सातपुते, शिवाजीराव कुलकर्णी, भाई संजय महाद्वार डॉ. नयनाताई शिरसाठ, सुशील पिंगळे, रवी वाघमारे, भोजराज पालेवाल, अभिषेक दिवे, राजेश विभुते, सतीश परदेशीं, दिलीप पवार यांचा सह मोठया संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.**

# जगातील सर्वश्रेष्ठ राज्यघटना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारत देशाला दिली-अ‍ॅड.सर्जेराव तांदळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक २८.०४.२०२५ वार सोमवार रोजी बीड तालुक्यातील रुई लिंबा या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.या कार्यक्रमास भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख,जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड.सर्जेराव तात्या तांदळे,संघटन सरचिटणीस देविदास नागरगोजे सर,उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे,शांतिनाथ डोरले आदि प्रमुख पाहुणे उपस्थित होते.



### जयदत्त नगर रुई लिंबा येथील प्रलंबित विकास ना.पंकजाताई च्या माध्यमातून पूर्ण करू

आपल्या मनोगतात अ‍ॅड.तांदळे म्हणाले की आज जो आपल्या देशाचा कारभार, कायदा,कानून चालत आहे तो फक्त डॉ.बाबासाहेब यांनी तयार केलेली राज्यघटना आणि पवित्र संविधान ह्या मुळे.आज समजातील सगळयात मागासलेला,गरीब, पिछाडलेला समाज याला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम डॉ. बाबासाहेब यांनीच केले. आज त्यांच्यामुळे प्रत्येक समाजातील वर्गाला समान न्याय मिळाला. प्रत्येकाला शिक्षणाची नोकरीची संधी मिळाली. मागासलेल्या समाजामध्ये आज अशी अनेक उदाहरणे आहेत ज्यांनी डॉक्टर ◀◀ पान ३ वर

# पंढरी येथील उद्यान विकासाचे साडेचार कोटी रुपये परळी नगर परिषदेला नियमबाह्य वळविले

## जिल्हाधिकारी कार्यालयातील जनता दरबारातून मांडली सत्य परिस्थिती

बीड । प्रतिनिधी

नगरपालिका क्षेत्रामध्ये प्राथमिक सोयी सुविधाच्या विकास कामासाठी विशेष अनुदान योजनेची अंमलबजावणी करण्यात येते करिता पंढरी धानोरा रोड बीड येथे उद्यान विकसित करणे व इतर कामे करणे करिता बीड नगर परिषदेस ५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून जिल्हाधिकारी पुणे यांच्या स्तरावरून आहारित करण्यात आले आहेत. मंजूर प्रकल्पाचे अंदाजपत्रकीय रकमेच्या ९०% रक्कम ४ कोटी ५० लक्ष रुपये शासन निधी व १०% स्वहिस्सा रक्कम ५० लक्ष रुपये मंजूर केला आहे. म्हणजेच क्र.२०२१/जीबी/डेस्क-१/एमयूएन/१३४९६ जिल्हाधिकारी कार्यालय बीड दि.०५ ऑक्टोबर २०२१ प्रशासकीय मान्यता दिली आहे. नगरपरिषद बीड यांनी कामास कार्यारंभ आदेश दिला होता तसेच सदरील काम चालूही झाले होते परंतु मध्येच हे काम बंद पडले आहे. वैशिष्ट्यपूर्ण योजनेसाठी प्राप्त ४ कोटी ९६ लक्ष ९८ हजार ८८ रुपये निधी बीड नगर परिषदेस वितरित करणे जिल्हा प्रशासन अधिकारी नगर विकास शाखा श्रेणी-१ जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांना प्राधिकृत करण्यात आले होते. परंतु तत्कालीन जिल्हाधिकारी, जिल्हा प्रशासन अधिकारी बीड व महिला कर्मचारी उज्वला राऊत यांनी संगनमताने टक्केवारी घेत सदरील निधी नगरपरिषद ◀◀ पान ३ वर

# खासदार बजरंग सोनवणे यांच्याकडून बाबुराव धारक यांच्या स्वादिष्ट रेवडीच कौतुक!

## श्री खंडेश्वर केटर्सच्या उत्कृष्ट चवीमुळे धारक कुटुंबाची ओळख!

कुसळंब । प्रतिनिधी

यात्रा, उत्सव, लग्नसराईमध्ये आपल्या वेगळयाच कलेतून नागरिकांच्या तोंडाची चव ओळखून स्वादिष्ट खाणं बनवण्याची कला धारक कुटुंबियांकडे परंपरेने आल्याने त्यामध्ये अधिक भर टाकण्याचं काम बाबुराव धारक यांच्या कडून होत असल्याने अनेकांकडून त्यांचं कौतुकही होत आहे. कुसळंब येथे एका लग्न समारंभाच्या निमित्ताने खासदार बजरंग सोनवणे आले असता त्यांना बाबुराव धारक यांनी रेवडी भेट दिली त्यातील रेवडी खाऊन खासदार बजरंग सोनवणे यांनी धारक यांचं कौतुक केलं आणि पुन्हा एकदा खायला येऊ असं देखील सांगितलं..

कुसळंब पाटोदा तालुकाच नव्हे तर जिल्हाभरामध्ये आपल्या स्वादिष्ट यात्रेतील रेवडी गुडीशेव जिलेबी बालुशाही शेव चिवडा पेढ्याची चव ही जिल्हाभरामध्ये पसरली आहे. धारकांनाच नाव आणि खंडेश्वर केटरर्स म्हटलं की स्वादिष्ट पदार्थाचं ठिकाण म्हणून ओळखलं जातं. खंडोबाच्या दर्शनासाठी येणारे जाणारे भक्त देखील आवर्जून त्यांना पार्सल घेऊन जाण्यासाठी सर्वच स्वादिष्ट पदार्थ बनवायला सांगतात. त्याचबरोबर यात्रेमध्ये ◀◀ पान ३ वर








This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे जिल्ह्यात पाण्याचा प्रश्न जटिल! विभागात टँकरची संख्या पोहोचली तब्बल १५० च्यावर

पुणे: नवराष्ट्र न्यूज नेटवर्क : पुणे जिल्ह्यासह पुणे विभागात पाणी टंचाईच्या तीव्र झळा बसत आहेत. दिवसेंदिवस यामध्ये वाढ होताना दिसत असून, आजमितीला पुणे जिल्ह्यातील १३ पैकी ७ जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याचा टँकर द्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर पुणे विभागातील पुण्यासह सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर येथे १५० च्या वर टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे.



पुणे शहर जिल्ह्यासह पुणे विभागात सध्या उन्हाची तीव्रता वाढत आहे. एप्रिल महिन्यातच उष्णतेच्या तीव्र लाटेने अंगाची लाहीलाही झाली. त्यातच हवामान खात्याने येत्या काही दिवसात उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. दरम्यान उन्हाच्या झळांसोबतच विभागातील अनेक धरणे, तलावातील जलसाठा कमी झाला आहे. नदी नाले तर कधीच कोरडेठाक पडले आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. काही ठिकाणी टँकरच्या फेऱ्या सुरू झाल्या आहेत, तर अनेक ग्रामपंचायतींवर ‘हंडा मोर्चा’ निघत आहेत.

उन्हाळ्यापूर्वी पाण्यासाठीची कोणतीच तजवीज नसल्याने पाणीटंचाईचे सावट भीषण होण्याची शक्यता आहे. जनावरांच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विभागातील गावांत यंदाही भीषण पाणीटंचाई आहे. गावातील तलाव पूर्ण कोरडे पडल्याने गावाशेजारील विहिरीतून महिलांना पाणी आणावे लागत आहे. टँकरद्वारे विहिरीत पाणी सोडले जाते आणि मग ते पाणी महिला भरतात. ही परिस्थिती अनेक ठिकाणी पाहण्यास मिळत आहे.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, पुणे जिल्ह्यातील १३ तालुक्यापैकी ७ तालुक्यात सध्या टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. यात आंबेगाव तालुक्यातील १९ गावात १९ टँकरने, भोर तालुक्यातील २ गावात २ टँकरने, हवेली तालुक्यातील २ गावात २ टँकरने, जुन्नर तालुक्यातील १५ गावात १३ टँकरने, खेड तालुक्यातील १० गावात ९ टँकरने, पुरंदर तालुक्यातील १७ गावात १७ टँकरने, शिरूर तालुक्यातील ३ गावात ७ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. पाणी टंचाई मुळे जिल्ह्यातील ६८ गावांमधील ४६२ वाड्या बाधित झाल्या असून, १ लाख १८ हजार ८४३ नागरिकांची तहान जिल्हा परिषदेच्या माध्यमातून भागवली जात आहे.


जलवाहिन्यांचे नकाशे नाहीत उपलब्ध

शहराच्या कानाकोपऱ्यात पाणीपुरवठा विभागाने जलवाहिन्यांचे जाळे निर्माण केले आहे. अनेक जलवाहिन्यांद्वारे पाणी येण्यास अडथळा येत आहे. तसेच जलवाहिन्याअसून देखिल पाणी येत नाही. जलवाहिन्यांचे कनेक्शन तसेच वॉल दुरुस्ती केली जाते. परंतु शहरातील जलवाहिन्यांचे नकाशेच पाणीपुरवठा विभागाकडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे पाण्याची समस्या सोडविण्यास वेळ लागत असल्याने नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे.

# मित्राला वाचवण्यासाठी गेलेल्या तरुणाचा रेल्वेच्या धडकेत मृत्यू; ‘तो’ बाजूला सरकला पण दुसराच अडकला

पिंपरी : दोन मित्रांचे भांडण झाले. एक मित्र रेल्वेखाली उडी मारून आत्महत्या करतो, असे सांगून रेल्वे ट्रॅकवर गेला. त्याला वाचविण्यासाठी गेलेल्या दुसऱ्या मित्राचा रेल्वेच्या धडकेत मृत्यू झाला. ही घटना आकुर्डी रेल्वे स्थानकाजवळ रावेत येथे घडली.

गणेश विठ्ठल लाड (बारामती) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी गणेश याचे वडील विठ्ठल किसन लाड (वय ५३) यांनी रावेत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, अभिजित गणेश गोळे (वय २५,भोसरी) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश लाड आणि अभिजित गोळे हे मित्र होते. गणेश याच्या मैत्रिणीवरून आणि त्या दोघांमध्ये पार्टनरशिपमध्ये असलेल्या कॅफेच्या आर्थिक कारणावरून त्यांच्यात वाद झाले.



दरम्यान, अभिजित हा रेल्वेखाली उडी मारून आत्महत्या करणार असल्याचा त्याने बनाव केला. तो रावेत येथे आकुर्डी रेल्वे स्थानकाजवळ रेल्वे ट्रॅकवर गेला. मित्र आत्महत्या करत असल्याने त्याला वाचवण्यासाठी गणेश गेला. अभिजित रेल्वे ट्रॅकवर असल्याने त्याला बाजूला करण्यासाठी गणेश देखील रेल्वे ट्रॅकवरून जात होता.

अभिजित बाजूला झाला अन् गणेश चिरडला गेला

रेल्वे आल्यानंतर अभिजित अचानक ट्रॅकवरून बाजूला झाला आणि गणेश रेल्वेखाली चिरडला गेला. जखमी गणेश याला रुग्णालयात उपचारासाठी दाखल न करता अभिजित पळून गेला. यामध्ये गणेश याचा मृत्यू झाला. रावेत पोलीस तपास करत आहेत.

समृद्धी महामार्गावर अपघात

समृद्धी महामार्गावर अपघाताच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहे. त्यात आता छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील बिडकीन येथून समृद्धी महामार्गाने नागपूरच्या दिशेने जात असलेल्या आयशर चालकाला डुलकी लागली. अशातच त्याने फलकाच्या लोखंडी खांबाला धडक दिली. या अपघातात आयशरचालक जागीच ठार झाला असून, क्लीनर जखमी आहे.



# वकिलांनी मुद्रांक जिल्हाधिकारी हिंगाणे यांच्यांपुढे वाचला समस्यांचा पाढा

**पुणे । प्रतिनिधी**

दस्त नोंदणी कार्यालयात मध्यस्थांचा वाढलेला सुळसुळाट, उपनिबंधकांची असहकार्याची भूमिका, कार्यप्रणातील अपुरे मनुष्यबळ, स्वच्छतागृहांची कमी संख्या, यंत्रणेतील तांत्रिक बदलांचा गोंधळ आदी समस्यांचा पाढाच कन्व्हेसिंग प्रॅक्टीस करणार्या वकिलांनी सोमवारी (दि. २८) मुद्रांक जिल्हाधिकारी संतोष हिंगाणे यांच्यापुढे वाचला.

दस्त नोंदणी करताना वकील वर्गाला येणार्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर मुद्रांक जिल्हाधिकारी हिंगाणे यांची शिवाजीनगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयातील पुणे बार असोसिएशनच्या कार्यालयाला भेट दिली. त्यावेळी वकिलांच्या सर्व समस्यांची माहिती घेऊन त्यावर सविस्तर चर्चा केली.

यावेळी, पुणे बार असोसिएशन व मुद्रांक प्रशासन यांमध्ये वर्षातून एकदा संवादात्मक बैठक पार पडावी, अशी भूमिका मांडण्यात आली. यावेळी, पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. हेमंत झंजाड, उपाध्यक्ष ॲड. समीर भुंडे, सचिव ॲड. भाग्यश्री गुजर-मुळे, सदस्य ॲड. आकाश गलांडे कन्व्हेंसिंग प्रॅक्टिस करणारे वकील व बार असोसिएशनचे माजी ऑडिटर ॲड. अजय देवकर यांसह बार असोसिएशनचे पदाधिकारी व वकील वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे-जोधपूर दैनंदिन रेल्वेसेवेला हिरवा कंदील; राजस्थानी समाजाच्या पाठपुराव्याला यश

**कात्रज : पुणे आणि जोधपूर दरम्यान दैनंदिन रेल्वेसेवेला रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिल्याने राजस्थानी समाजाला मोठा दिलासा मिळाला आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही घोषणा केली असून, रेल्वे क्रमांक २०४९५ (जोधपूर-हडपसर) आणि २०४९६ (हडपसर-जोधपूर) या सुपरफास्ट एक्स्प्रेस गाड्या लवकरच हडपसर रेल्वे स्थानकावरून नियमितपणे धावणार आहेत.**



राजस्थानी समाज संघाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही मागणी पूर्ण झाली असून, यामुळे प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. रेल्वेचे बुकिंग लवकरच सुरू होणार आहे, अशी माहिती संघाचे अध्यक्ष मगराज राठी यांनी दिली.

अनेक वर्षाच्या मागणीला यश -

पुणे जिल्ह्यातील राजस्थानी समाज गेल्या अनेक वर्षांपासून पुणे-जोधपूर दरम्यान दैनंदिन रेल्वेसेवेची मागणी करत होता. या मागणीसाठी राजस्थानमधील खासदार पी. पी. चौधरी, केंद्रीय जलशक्तीमंत्री गजेंद्रसिंग शेखावत, पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्यासह अनेकांनी रेल्वेमंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला.

राजस्थानी समाज संघाने या मागणीला व्यापक पाठबळ देत आंदोलने, निवेदने आणि बैठका आयोजित केल्या होत्या. यापूर्वी साप्ताहिक रेल्वेसेवा सुरू झाली होती, परंतु समाजाची खरी मागणी दैनंदिन रेल्वेसेवेची होती, जी आता पूर्ण झाली आहे.

बस प्रवासातील जोखमीला आळा -

पुणे-जोधपूर दरम्यान सध्या दररोज सुमारे ६० ते ७० बसेस धावतात. या बस प्रवासादरम्यान वारंवार होणारे अपघात आणि त्यात होणारे जीवितहानी यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण होते. मगराज राठी यांनी सांगितले, बस प्रवासात अपघातांमुळे अनेक निष्पाप जीव गमवावे लागले. दैनंदिन रेल्वेसेवेमुळे प्रवास सुरक्षित होईल आणि प्रवाशांना परवडणारा, आरामदायी पर्याय मिळेल. राठी यांनी रेल्वे मंत्रालय, अश्विनी वैष्णव आणि सर्व सहभागींचे आभार मानले, तसेच ही सेवा लवकर सुरू व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.


रेल्वेचे थांबे आणि मार्ग -

ही सुपरफास्ट एक्स्प्रेस पुणे आणि जोधपूर दरम्यान पाली, मारवाड, अबू रोड, पालनपूर, मेहसाना, अहमदाबाद, बडोदरा, सुरत, वापी, वसई रस्ता, कल्याण, लोणावळा, चिंचवड या प्रमुख स्थानकांवर थांबा घेईल.

हडपसर रेल्वे स्थानकावरून सुटणारी ही गाडी पुणे परिसरातील प्रवाशांसाठी सोयीस्कर ठरेल. या मार्गावरील अनेक शहरांमध्ये मोठ्या संख्येने राजस्थानी समाज वास्तव्यास आहे, त्यामुळे या रेल्वेमुळे त्यांचा प्रवास सुलभ होईल.

# नवले पुलावर वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांना पोलिसांनी घेतले ताब्यात

पुणे : नवले पुलाजवळ वेश्याव्यवसाय करणाऱ्या तीन महिलांविरुद्ध सिंहगड रस्ता पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी अनैतिक मानवी व्यापारास प्रतिबंध अधिनियमान्वये (कलम ८) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई ज्योती हुलावळे यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्ग परिसरातील नवले पुलाजवळ वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिला थांबतात. त्या अश्लील हावभाव करतात, तेथून जाणारे नागरिक, वाहनचालकांना इशारे करतात, अशा तक्रारी नागरिकांनी पोलिसांकडे केल्या होत्या. त्यानंतर पोलिसांनी नवले पूल परिसरात थांबणाऱ्या तीन महिलांविरुद्ध कारवाई करून त्यांना ताब्यात घेतले आहे.

त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलीस निंबाळकर तपास करीत आहेत. यापूर्वीसुद्धा नागरिकांच्या तक्रारीनंतर येथे कारवाई केली होती, परंतु पुन्हा तसाच प्रकार सुरू झाला. नवले पूल परिसरात थांबणाऱ्या महिलांमुळे वाहतुकीस अडथळा होतो. तसेच, नवले पूल सेवा रस्ता परिसरात गंभीर स्वरुपाचे अपघात घडले आहेत.

# लाचखोरीच्या प्रकारानंतर झेडपीत २५ कर्मचाऱ्यांची बदली

पुणे । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या दक्षिण विभागाचे कार्यकारी अभियंत्यासह तिघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडल्याच्या प्रकरणानंतर जिल्हा परिषदेमध्ये सर्व टेंडर कारकुनांसह तब्बल २५ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांबाबत केलेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली आहे. मात्र, प्रशासकीय कारणास्तव या बदल्या करण्यात आल्याचे जिल्हा परिषद प्रशासनाचे म्हणणे आहे.



दक्षिण बांधकाम विभागामध्ये लाचखोरीमुळे तत्कालीन कार्यकारी अभियंता, उपअभियंता आणि एका कनिष्ठ अभियंत्याला रंगेहाथ पकडण्यात आल्यानंतर निलंबित करण्यात आले. त्यानंतर लगेचच एका लेखाधिकाऱ्याची बदली करण्यात आली. मात्र, याचवेळी दक्षिण आणि उत्तर बांधकाम विभागातील टेंडर कारकून काही ऑडीटर्स बिलिंगची जबाबदारी असणाऱ्या कर्मचारी यांच्याबाबत तक्रारी होत्या. मार्चअखेर असल्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाकडून कारवाईची प्रक्रिया थोडी लांबणीवर टाकण्यात आली, मात्र, तब्बल २५ पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश बजावण्यात आले.

# पुरंदर विमानतळाचे नक्की काय होणार ? शेतकऱ्यांचा विरोध तर सरकार ठाम

सासवड: पुरंदर तालुक्यातील विमानतळ प्रकल्पाला शेतकऱ्यांचा जोरदार विरोध असताना शासन मात्र प्रकल्पावर ठाम असल्याचे दिसत आहे. दोन दिवसापूर्वी हजारो शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर भर उन्हात मोर्चा नेवून शासनाचा जोरदार निषेध केला होता. तसेच कोणत्याही परिस्थितीत विमानतळ प्रकल्प होवू देणार नसल्याचा निर्धार केला होता. मात्र असे असताना प्रशासनाने प्रकल्प बाधित गावात जावून नोटीस पोहोच केल्या आहेत. मात्र शेतकऱ्यांनी नोटीस स्वीकारण्यास थेट नकार दिला आहे.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवादी, कुंभारवळण, पारगाव, एखतपूर, मुंजवडी, खानवडी अशा सात गावात विमानतळ प्रकल्पाची आखणी करण्यात आली असून यासाठी २८३२ हेक्टर क्षेत्र संपादित केले जाणार आहे. यासाठी शासकीय विविध पातळ्यांवर प्रयत्न करीत आहे. यापूर्वी किमान दोन, तीन वेळा जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांची भेट घेवून विमानतळ प्रकल्पाला शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे. त्यानंतर सासवड मध्ये तीन दिवसांचे उपोषण देखील केले आहे. मात्र तरीही अधिकाऱ्यांनी गावोगावी जावून शेतकऱ्यांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला आहे.



शेतकऱ्यांनी गावोगावी बैठका घेवून जमीन न देण्याबाबत ठराव करून शासनाकडे पाठवून दिले आहेत. त्यानंतर शासनाकडून विविध वृत्तपत्र मध्ये जाहिरातीद्वारे विमानतळ प्रकल्पाबाबत हरकती व सूचना देण्याबाबत एक महिन्यांची मुदत दिली आहे. त्यानंतर प्रकल्प बाधित शेतकऱ्यांनी पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेवून लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र शासन त्यांच्या निर्णयवरती ठाम असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या कोणत्याही मोर्चा, निवेदने, आंदोलने यांचा विचार न करता गावोगावी नोटीस पाठवून मोकळे होत आहेत.

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावच्या चावडीवर, सार्वजनिक ठिकाणी नोटीस ठेवण्यात आल्या असून नोटीस स्वीकाराव्यात आणि एक महिन्यात आपल्या हरकती लेखी स्वरुपात पुरंदरच्या प्रांताधिकारी कार्यालयात पोहोच कराव्यात असे त्यामध्ये म्हंटले आहे. मात्र यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे मोठ्या प्रमाणात वातावरण पसरले आहे. आम्हाला विमानतळ प्रकल्पाला जमीनच द्यायची नाही., आम्हाला शासनाचा कोणताही परतावा नको, आम्हाला आमची जमीनच पाहिजे, आमचे गाव सोडून कुठेही जाणार नाही, त्यामुळे तुमच्या नोटीस स्वीकारण्याचा आणि त्याला उत्तर देण्याचा प्रश्नच येत नाही. अशी भूमिका सातही गावच्या शेतकऱ्यांनी घेतली आहे.

राजकीय पाठींबा नसल्याने शेतकऱ्यांचा एकाकी लढा सुरु.

पुरंदरला विमानतळ प्रकल्प झाल्यानंतर प्रकल्प बाधित सातही गावातील शेतकऱ्यांनी कडाडून विरोध केला आहे. यामध्ये सुरुवातीला राजकीय पाठींबा मोठ्या प्रमाणात मिळाला. माजी आमदार संजय जगताप सुरुवातीपासून शेतकऱ्यांसोबत आहेत तो पाठींबा त्यांनी कायम टिकवून ठेवला आहे. त्यांच्या सोबतच सुरुवातीला आंदोलनात उतरलेले माजी जीप अध्यक्ष जालिंदर कामठे, भाजपचे नेते बाबाराजे जाधवराव यांनी आंदोलनात प्रत्यक्ष सहभाग घेतला. नंतरच्या काळात जालिंदर कामठे आणि बाबाराजे जाधवराव यांनी पक्षबदल केल्यावर त्यांच्या भूमिकेतही बदल झाला.

खासदार सुप्रिया सुळे यांनी केवळ शेतकऱ्यांना विश्वासात घेवून विमानतळ करावे, त्यांचे नुकसान होवून देणार नाही असे सांगितले, मात्र शेतकऱ्यांच्या सोबत एकाही आंदोलनात कधी सहभाग घेतला नाही. एवढेच काय पण लोकसभेत प्रचार करण्यासाठी गावोगावी फिरणारे राष्ट्रवादीचे नेतेही सध्या कुठेही दिसत नाहीत. सासवड येथे तीन दिवस उपोषण सुरु असताना एकाही राजकीय नेत्याने साधी चौकशीही केली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना कोणताही राजकीय पाठबळ नसताना एकाकी लढा द्यावा लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा एकाकी लढा किती काळ टिकणार ? आणि तो यशस्वी होणार का ? असे प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहेत.